MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष एकविसावे / अंक ३ / मार्च २०२०

## संपादकीय

### स्मरण एका विज्ञान प्रसारकाचे

विज्ञान हा तसा कठीण विषय आहे. त्यातील बोजड संकल्पना सगळ्यांना समजतीलच याची खात्री देता येत नाही. त्यामुळे सर्वसामान्य जनता विज्ञानापासून चार हात दूरच राहते. असे जरी असले तरी वैज्ञानिक प्रगतीचा त्यांच्या जीवनावर प्रभाव पडतच असतो. तंत्रज्ञानाच्या मदतीने वैज्ञानिक तत्त्वांचा आधार घेऊन तंत्रज्ञांनी अनेक सुखसुविधा निर्माण केलेल्या आहेत. त्यांचा उपयोग कसा करावा यासाठी थोडेसे तरी विज्ञान त्यांना समजणे आवश्यक असते. वैज्ञानिक प्रगतीने अनेक प्रकारच्या अंधश्रद्धांचे निर्मूलन केले आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर सूर्य ग्रहणाचे देता येईल. राहू आणि केतू जेव्हा सूर्याला गिळतात तेव्हा सूर्य झाकला जातो असा लोकांचा समज होता. विज्ञानाने तो खोटा ठरविला असून सूर्य आणि पृथ्वी यामध्ये चंद्र आल्यामुळे असे होते हे सिद्ध केले आहे. तसेच, देवीचा रोग हा देवीच्या कोपण्यामुळे होते अशी अंधश्रद्धा समाजामध्ये होती. विज्ञानाने असे सिद्ध केले की, हा रोग जंतूंमुळे होतो. त्यामुळे रोगी बरा होण्यासाठी देवीची पूजा करण्याऐवजी वेळीच उपचार करणे आवश्यक आहे. या बाबींची जाणीव समाजातील सर्वसामान्य व्यक्तींना होण्याची गरज आहे.

वैज्ञानिक संकल्पना पारिभाषिक शब्दांच्या मदतीने बोजड भाषेत लिहिण्याची प्रथा आहे. सर्वसामान्य माणसाला विज्ञान समजावून सांगायचे असेल तर ते त्याला समजेल अशा सोप्या भाषेत लिहिण्याची, तसेच सांगण्याची गरज आहे. असा प्रयत्न १९ व्या शतकात मायकेल फॅरेडे (Michael Faraday) यांनी केला. इंग्लंडच्या रॉयल सोसायटी (Royal Society of London) मध्ये ते प्रयोगशाळा परिचारक म्हणून काम करीत होते. ते एका सामान्य कुटुंबातून आले होते आणि त्यांचे शिक्षणही फारसे झाले नव्हते. आपल्या आजूबाजूला राहणाऱ्या लोकांना विज्ञान कळावे यासाठी ते दर शुक्रवारी संध्याकाळी रॉयल सोसायटीमध्ये व्याख्याने देत असत. त्यांच्या व्याख्यानांना सर्वसामान्य लोकांबरोबरच अनेक प्रथितयश लोक देखील हजेरी लावत असत. त्यांची व्याख्याने 'फॅरेडेज फ्रायडे लेक्चर्स' (Faraday's Friday Lectures) म्हणून प्रसिद्ध आहेत.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

ज्या काळात मायकेल फॅरेडे लंडन मध्ये विज्ञान प्रसार करीत होते त्याच काळात महाराष्ट्रात एक अवलिया वैज्ञानिक मराठीतून विज्ञान समजावून सांगायचा प्रयत्न करीत होता. त्यांचे नाव विनायक लक्ष्मण ऊर्फ केरूनाना छत्रे. अलिबाग जवळील नागाव येथे १८२४ साली त्यांचा जन्म झाला. आई आणि वडील या दोघांचेही छत्र त्यांच्या बालपणीच हरवले. मुंबईत राहत असलेल्या काकांच्या मदतीने त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. पुण्याच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात त्यांनी आपले शिक्षण केले. आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे त्यांचे शिक्षक होते. त्याचबरोबर आर्थर बेडफोर्ड अर्लिबार नावाचे एक ब्रिटिश प्राध्यापक त्यांना शिकवायला होते. या प्राध्यापकाचे ते आवडते विद्यार्थी होते. त्यांनी १८४० साली मुंबईत एक वेधशाळा स्थापन केली. या वेधशाळेत काम करण्यासाठी त्यांनी केरूनानांना पाचारण केले. त्यांच्या आग्रहाखातर त्यांनी काही वर्षे मुंबईच्या वेधशाळेत काम केले. परंतु वेधशाळेत काम करीत राहणे हा त्यांचा पिंड नव्हता. वाचन, लेखन, अध्यापन या बाबींकडे त्यांचा कल होता. आपल्या आवडीनुसार त्यांनी पुण्याच्या एका शाळेत विज्ञान शिक्षक म्हणून प्रवेश केला. काही वर्षांतच त्यांनी पुण्याच्या प्रसिद्ध डेक्कन कॉलेज मध्ये विज्ञान आणि गणित शिकविण्याचे काम स्वीकारले. या कॉलेजमध्ये बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर आणि विष्णूशास्त्री चिपळूणकर हे त्यांचे विद्यार्थी होते.


एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात इंग्रजी शिक्षणाने भारतात आपले पाय रोवले. पश्चिमेकडील देशात विज्ञानाचा जो विकास झाला त्याची माहिती आंग्ल भाषेतून दिली जायची. सर्वसामान्य माणसाला विज्ञान कळावे यासाठी ते स्थानिक भाषेत असावे यावर त्यांचा दृढ विश्वास होता. त्यानुसार त्यांनी मराठी भाषेतून विज्ञान पुस्तके लिहिण्याचे काम हाती घेतले. अनेक विद्या विषयक बालशिक्षण ग्रंथमालेसाठी त्यांनी भौतिक शास्त्र या विषयावरील पुस्तक लिहिले. त्यातील एक उतारा खाली उद्‌धृत केला आहे. त्यावरून केरूनानांची विषय सोपा करून सांगण्याची हातोटी आपल्या लक्षात येईल.–

'माझ्या जवळ एक सुपारी आहे. ही मी खाली जमिनीवर ठेवितो. तिच्यावर दडपण हा धोंडा ठेवितो. त्या धोंड्याखाली सुपारी जशीच्या तशीच आहे. आता धोंडा दोन–चार हात उचलून त्या सुपारीवर सोडतो. आता त्याने सुपारीचे तुकडे तुकडे करून टाकिले. असे कां बरे झाले?'

केवळ विज्ञानच नव्हे तर गणित देखील सोपे करून सांगण्याचा त्यांचा प्रयत्न असे. त्यांनी लिहिलेल्या 'अंकगणित' या पुस्तकातील एक उदाहरणच येथे उद्‌धृत केले आहे. भाषा किती सोपी आहे आणि गणित घालण्याची पद्धत किती चांगली आहे याकडे कृपया लक्ष द्यावे.

सेंटिग्रेड म्हणून एक प्रकारचे उष्णतामापक यंत्र आहे. त्यात ० अंशावर पारा असतो तेव्हा पाणी थिजते व १०० अंशावर असतो तेव्हा पाण्यास कढ येते. तसेच फारेनहाईट नावाचे दुसऱ्या प्रकारचे उष्णतामापक यंत्र आहे. त्यात ३२ अंशावर पारा असतो तेव्हा पाणी थिजते व २१२ अंशावर असतो तेव्हा पाण्यास कढ येतो. फारेनहाईटच्या ६८ अंशाबरोबर सेंटिग्रेडचे किती अंश होतील?

(पृष्ठ क्र. ११ वर)



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष एकविसावे/अंक ३/ मार्च २०२०

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २४ वे/अंक ९ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | १८ व्या शतकातील कर्नाटक युद्धे | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ३ |
| ३) | कला आणि व्यक्तिमत्त्व | मनीषा चव्हाण | १२ |
| ४) | उगवत्या सूर्याच्या देशातून | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | १४ |
| ५) | वेळणेश्वर अभ्यासदौऱ्याच्या निमित्ताने | सहा. प्रा. डॉ. अर्चना प्रभुदेसाई | १७ |
| ६) | प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था | श्री. मधुकर गजानन दातार | १९ |
| ७) | गोंगलाची फुलं | श्री. प्रकाश दुधाळकर | २५ |
| ८) | ....आणि तो कोसळला | श्री. चन्द्रशेखर टिळक | २७ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३१ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# १८ व्या शतकातील दक्षिण भारतातील कर्नाटक युद्धे

*दक्षिण भारतात १८ व्या शतकात ब्रिटिश व फ्रेंच यांच्यात झालेल्या सत्ता संघर्षाची माहिती देणारा लेख - संपादक*

फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना १६६४ मध्ये फ्रान्समध्ये स्थापना झाली. या कंपनीची मुहुर्तमेढ फ्रान्सचा तत्कालीन सम्राट चौदावा लुई याचा अर्थमंत्री जॉन बॅप्टीस्ट कोलवर्ट (John Baptist Colbert) याने रोवली. १६६४ ते १७१९ या कालावधीत ही कंपनी 'फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी' वा 'फ्रेंच कंपनी ऑफ द ईस्ट इंडीज्', १७१९ ते १७२० या कालावधीत 'कंपनी ऑफ द इंडीज्' व १७२० ते १७८९ या कालावधीत 'फ्रेंच कंपनी ऑफ द इंडीज' या नावाने ओळखली जात असे. या कंपनीचा प्रमुख उद्देश भारत, पूर्व आफ्रिका व हिंद महासागरातील इतर भूप्रदेश, तसेच ईस्ट इंडीज (साधारणतः सध्याचा इंडोनेशिया हा देश) सोबत व्यापार करणे हा होता. सुरुवातीच्या काळात फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीकडे व्यापाऱ्यांचा म्हणावा तेवढा ओढा नव्हता. त्यामुळे जॉन बॅप्टीस्ट कोलबर्टला कंपनीला आर्थिक मदत करण्याच्या दृष्टीने व्यापाऱ्यांवर दबाव टाकावा लागला असे म्हटले जाते. 'ईस्ट इंडिया कंपनी'कडे व्यापारी व सामान्य लोकांना आकर्षिक करून घेण्यासाठी कोलबर्टने फ्रँकॉई शॅरपेन्टीयर (Francois Charpentier) यास जाहिरात लिहिण्यास सांगितले होते.

१८ व्या शतकामध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी व फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीने भारतात आपले पाय रोवण्यास सुरुवात केली होती. इंग्रज व्यापाऱ्यांनी पश्चिम किनाऱ्यावर सुरत व मुंबई, तर पूर्व किनाऱ्यावर मद्रास तसेच कलकत्त्यासारख्या ठिकाणी आपल्या वखारी स्थापन केल्या होत्या. फ्रेंचांनी पश्चिम किनाऱ्यावर माहे (केरळ) व पूर्व किनाऱ्यावर मसुलीपटनम् (आंध्र प्रदेश), चांद्रनागोर (बंगाल), तसेच पाँडिचेरी या ठिकाणी आपला व्यापार करण्यास सुरुवात केली होती.

ब्रिटिश व फ्रेंच व्यापाऱ्यांमध्ये भारतात जास्तीत जास्त प्रदेशांशी व्यापारी संबंध प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने स्पर्धेला सुरुवात झाली व या स्पर्धेची परिणती तीन युद्धांमध्ये झाली. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी व फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीदरम्यान झालेली ही युद्धे इतिहासात 'कर्नाटक युद्धे' (इंग्रजीत कर्नाटीक वॉर्स - Carnatic Wars) म्हणून प्रसिद्ध आहेत. पहिले कर्नाटक युद्ध - १७४६ ते १७४८ या काळात, दुसरे कर्नाटक युद्ध - १७४९ ते १७५४ तर तिसरे कर्नाटक युद्ध १७५८ ते १७६३ या कालावधीत झाले. सुरुवातीस जरी फ्रेंचांना ब्रिटिशांविरुद्ध थोडेफार यश मिळालेले असले तरी शेवटी ब्रिटिशांना फ्रेंचांवर निर्णायक विजय प्राप्त करून त्यांना भारतातून जवळ-जवळ हद्दपार करण्यात यश आलेले निदर्शनास येते.

युरोपात इंग्लंड व फ्रान्स या दोन देशांमध्ये १८ व्या शतकात जी स्पर्धा, संघर्ष व युद्धे होत असत त्याचे पडसाद भारतात उमटलेले आढळतात. १७४० च्या आसपास युरोपातील ऑस्ट्रीया या देशात जेव्हा सिंहासन वा गादीसाठी राजघराण्यात सुंदोपसुंदी वा संघर्ष सुरू झाला तो वाद १७४६ मध्ये भारतात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी व फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीतील युद्धास कारणीभूत ठरला असे म्हणणे वावगे ठरू नये. ऑस्ट्रीयातील राजघराण्यातील सत्ता संघर्षाचे प्रमुख

कारण असे होते की, ऑस्ट्रीयाचा हॅप्सबर्ग (Hapsburg) राजघराण्याचा सम्राट सहावा चार्ल्स याची कन्या मारिया थेरेसा हिला तिच्या पित्याच्या वडिलोपार्जित भूप्रदेशांवर हक्क द्यावा की नाही? युरोपातील साधारणतः ६ व्या शतकातील सॅलिक कायद्यानुसार वा संहितेनुसार (Salic Law – हे कायदे लॅटीन भाषेत लिहिले गेले होते) स्त्रिला गादीवर बसता येत नव्हते. त्यामुळे प्रामुख्याने फ्रान्स, प्रशिया, बव्हारिया, स्वीडन या देशांनी मारिया थेरेसा हिच्या गादीवरील हक्काला आव्हान दिले; तर ब्रिटन, डच रिपब्लीक, सॅक्सनी, रशिया आदी देशांनी मारियाला पाठिंबा दर्शविला. या युद्धाची परिणती मारिया थेरेसा हिला तिचा राजगादीवरचा हक्क मिळण्यात वा प्राप्त होण्यात; तर तिचा पती फ्रँसिस ऑफ लॉरेन (Francis of Lorraine) याला होली रोमन एम्परर–सम्राट (Holy Roman Emperor) म्हणून मान्यता मिळण्यात झाली. असो. तर आपला मूळ मुद्दा होता की, युरोपात ऑस्ट्रीयाच्या राजगादीवरून जेव्हा फ्रान्स व इंग्लंड एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले तेव्हा त्यांच्या व्यापारी कंपन्यांनीदेखील भारतात एकमेकांविरोधात पाय रोवले. तसे पाहता या दोन्ही देशांतील शासकांनी त्यांच्या भारतात कार्यरत असणाऱ्या व्यापारी कंपन्यांना तेथे कुठलाही तंटा उद्भवू न देता शांतता राखण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु याचा काहीही उपयोग झाला नाही व १७४६ मध्ये फ्रेंच व ब्रिटिश व्यापारी कंपन्यांमध्ये पहिल्या कर्नाटक युद्धाचा भडका उडाला. ब्रिटिश आरमाराने बार्नेट याच्या नेतृत्वाखाली भारताच्या पूर्व किनाऱ्यावर फ्रेंचांची काही गलबते ताब्यात घेतली. त्यामुळे पाँडिचेरीचा फ्रेंच गव्हर्नर जनरल ड्यूप्ले (Dupleix) याने मॉरिशचा फ्रेंच गव्हर्नर ला बूर्डोनॉय (La Bourdonnais) याच्याकडून लागलीच कुमक व मदत मागविली. मॉरिशस हे हिंद महासागारातील बेट असून ते फ्रेंचांच्या ताब्यात होते. ला बूर्डोनॉय तीन हजार सैनिकांसह आपल्या जहाजांचा ताफा घेऊन भारताच्या कोरोमँडल किनाऱ्यावर (Coromandal Coast इंग्रजीत साधारणतः तामीळनाडू व आंध्र प्रदेशच्या समुद्र किनाऱ्याला कोरोमँडल कोस्ट व किनारा असे म्हणतात) येऊन थडकला. त्याने ब्रिटिशांच्या आरमाराचा पराभव केला व फ्रेंचांनी मद्रासला जमीन व समुद्र अशा दोहो बाजूंनी वेढा घातला. अशा तऱ्हेने ब्रिटिशांवर पराभवाची नामुष्की आली व २१ सप्टेंबर १७४६ रोजी मद्रास फ्रेचांच्या ताब्यात आले. या घटनेनंतर फ्रेंचांनी मद्रासमध्ये जे युद्धकैदी ताब्यात घेतले त्यात रॉबर्ट क्लाईव्ह याचादेखील समावेश होता. पुढे रॉबर्ट क्लाईव्हने १७५७ च्या प्लासीच्या लढाईत बंगालचा तत्कालीन नवाब सिराज उद्दौला याच्या सैन्याचा पराभव करून बंगाल प्रांत ताब्यात घेतला व तेथूनच खऱ्या अर्थाने भारतावर ब्रिटिशांचे राज्य प्रस्थापित होण्याची सुरुवात झाली. असो. ला बूर्डोनॉयने आपल्या धडाकेबाज कारवाईने ब्रिटिशांना जेरीस तर आणलेच, पण त्यांच्यावर मद्रास हे शहर फ्रेंचांना देण्याची नामुष्कीदेखील आली. परंतु ब्रिटिश हे मुत्सद्दी व चाणाक्ष असल्यामुळे त्यांनी बूर्डोनॉयला लाच देऊन मद्रास शहर त्याच्याकडून परत मिळविले. ड्यूप्लेला बूर्डोनॉयचे हे कृत्य रुचले नाही. त्यामुळे त्याने ब्रिटिशांकडून मद्रास पुन्हा एकदा जिंकून घेतले. ड्यूप्लेला मद्रासच्या साधारणतः अठरा मैल दक्षिणेला असलेली सेंट डेव्हीड ही वखार मात्र जिंकता आली नाही. ब्रिटिशांनी फ्रेंचाना कोंडीत पकडण्यासाठी रियर ॲडमिरल बोस्कावेल (Rear Admiral Boscawen) याच्या नेतृत्वाखाली आपल्या आरमाराच्या मदतीने पाँडिचेरीला वेढा घातला. परंतु त्याचादेखील फारसा उपयोग झाला नाही.

पहिल्या कर्नाटक युद्धात ज्या लढाया लढल्या गेल्या त्यापैकी एक महत्त्वाची लढाई म्हणजे कर्नाटकचा तत्कालीन नवाब अनवरउद्दीन व फ्रेंच यांच्यात सेंट थोम (St. Thome – हे ठिकाण मद्रासमध्ये होते) येथे

झालेली लढाई होय. फ्रेंच आणि ब्रिटिश यांच्या दरम्यान दक्षिण भारतात जो काही वाद चालला होता व त्यामुळे त्यांच्यात लढाया व युद्धे होत होती ती त्यांनी थांबवावीत व तेथे अशांतता निर्माण करू नये असे अनवरउद्दीन याने या दोन्ही युरोपीय सत्तांना बजावले. त्यामुळे ड्यूप्लेने अनवरउद्दीनची मर्जी राखण्यासाठी मद्रास जिंकल्यानंतर ते अनवरउद्दीनला देऊ असे कबूल केले होते. परंतु जेव्हा ड्यूप्लेची मद्रास हे शहर नवाबाला देण्याची काही चिन्हे दिसत नाहीत असे लक्षात आल्यावर नवाब अनवरउद्दीनने फ्रेंचांविरुद्ध दहा हजार सैनिक पाठवून दिले. फ्रेंचांकडे तेव्हा दोनशे तीस युरोपीयन व सातशे भारतीय असे मिळून अवघे साडे-नऊशेच्या आसपास सैन्य होते. नवाबाच्या सैन्याचे नेतृत्व महफूझ खान तर फ्रेंच सैन्याचे नेतृत्व पॅराडाईज करत होता. फ्रेंचांकडे नवाबाच्या तुलनेत एवढे कमी सैन्य असूनदेखील पॅराडाईजच्या कुशल युद्धनेतृत्वामुळे व फ्रेंच सैन्याच्या शिस्तबद्धतेमुळे त्यांना भारतीय सैन्याचा पराभव करणे शक्य झाले असे म्हणणे वावगे ठरु नये. या दोन्ही सैन्यांमध्ये अड्यार नदीच्या किनाऱ्यावर लढाई झाली व नवाबाचे भारतीय सैन्य पराभूत झाले.

आपण अगोदर उल्लेख केलेलाच आहे की, युरोपमध्ये जेव्हा ऑस्ट्रीयाच्या राजगादीवरून युद्ध सुरू झाले त्याची परिणती भारतात ब्रिटिश व फ्रेंचांच्या दरम्यान झालेल्या पहिल्या कर्नाटक युद्धात झाली. युरोपमधील हे युद्ध (ऑस्ट्रीयन युद्ध) १७४८ मध्ये ऐक्स-ला-चॅपेलच्या तहानुसार (Treaty of Aix-la-Chapelle) वा आचेनच्या तहानुसार (Treaty of Aachen) संपले. सुरुवातीला ब्रिटन, फ्रान्स व डच रिपब्लिक (युनायटेड प्रोव्हिन्सेस ऑफ नेदरलँडस्) या देशांनी हा शांतता करार केला व त्यानंतर ऑस्ट्रिया, स्पेन, सर्डिनिया, मॉडेना, जिनोआ हे देशदेखील त्यात सामील झाले. या तहानुसार ब्रिटिशांनी कॅनडाच्या पूर्व किनाऱ्यावरील नोव्हा स्कोटिया प्रांतातील लूईसबर्ग हे ठिकाण फ्रेंचांना द्यावे व त्याबदल्यात १७४६ साली फ्रेंचांनी भारतात ब्रिटिशांकडून जिंकलेले मद्रास त्यांना म्हणजेच ब्रिटिशांना परत द्यावे असे मान्य करण्यात आले. अशाप्रकारे युरोपच्या राजकारणात घडलेल्या या नाट्यमय घटनांमुळे ब्रिटिशांना फ्रेंचांकडून मद्रास हे ठिकाण परत मिळाले. अर्थात, ड्यूप्लेला हे काही रुचले नाही. मात्र त्याच्या मायभूमीच्या म्हणजेच फ्रान्सच्या सम्राटाच्या निर्णयापुढे त्याला झुकावे लागले व युद्ध करून जिंकून घेतलेले मद्रास पुन्हा एकदा ब्रिटिशांच्या पदरात टाकावे लागले. ऐक्स-ला-चॅपेलच्या तहात १७५६ ते १७६३ या कालावधीत जे सात वर्षांचे युद्ध (Seven Years War) झाले त्याची बिजे होती असे तज्ज्ञांचे मत आहे. असो. अशाप्रकारे भारतातील फ्रेंच व ब्रिटिशांमधील स्पर्धेची व युद्धाची पहिली फेरी फ्रेंचांनी जिंकली असे म्हणणे वावगे ठरू नये. ब्रिटिशांना मद्रासचा बचाव करणे शक्य झाले नाही. तसेच त्यांच्या आरमाराच्या मदतीनेसुद्धा त्यांना फ्रेंचांवर मात करता आली नाही. अर्थात, ब्रिटिशांना मद्रास परत मिळाले पण ते सैनिकी बळावर नव्हे तर तहाच्या मार्फत.

इसवीसन १७४९ ते १७५४ या कालावधीत ब्रिटिश व फ्रेंचांच्या दरम्यान भारतात दुसरे कर्नाटक युद्ध झाले. पहिल्या कर्नाटक युद्धातील यशामुळे ड्यूप्लेच्या भारतातील महत्त्वाकांक्षा वाढल्या होत्या व दक्षिण भारतामध्ये फ्रेंचांचा प्रभाव निर्माण करावा व वाढवावा असे त्याला वाटत होते. ड्यूप्लेला ही संधी लवकरच चालून आली. दक्षिणेतील हैदराबाद या राज्याचा पहिला स्वतंत्र शासक निझाम-उल-मुल्क असफ झा याचा २१ मे १७४८ साली मृत्यू झाला. येथे एक बाब नमूद करणे आवश्यक आहे व ती ही की, औरंगजेब या मुघल बादशहाच्या मृत्यूपश्चात याने मुघलांचा दख्खनचा सुभा वेगळा करून हैदराबादचे स्वतंत्र राज्य निर्माण

केले होते व तो त्याचा पहिला शासक झाला होता. याचे मूळनाव मीर कमरुद्दीन खान सिद्दीकी बयाफंदी असे होते व इतिहासकारांच्या मते याचा जन्म २० ऑगस्ट १६७१ रोजी आग्रा येथे झाला होता. अभ्यासकांचे असे मत आहे की, निझाम-उल-मुल्क असफ झा हा मोहम्मद पैगंबराचा सासरा अबू बक्र याचा वंशज होता. त्याच्या पणजोबाचे नाव आलम शेख (हे बुखरा-सध्याच्या उझबेकिस्तानातील ठिकाण येथील सुफी संत होते) असे होते; तर त्याच्या आजोबाचे नाव किलीच खान असे होते व हा किलीच खान उझबेकिस्तानातील सामरकंद येथून भारतात आला होता व त्याने मुघलांच्या सैन्यात चाकरी स्वीकारली होती. निझाम-उल-मुल्कच्या वडिलांचे नाव गाझीउद्दीन खान पहिला फिरोझ जंग असे होते व हा देखील मुघलांच्या सेवेत उच्च पदावर (आमीर) होता. असो. तर आपला मूळ मुद्दा असा होता की, १७४८ साली निझाम-उल-मुल्क असफ झा याचा मृत्यू झाला व त्याच्या मृत्युपश्चात त्याचा द्वितीय पुत्र नासिर जंग हा हैदराबादच्या गादीवर आला. परंतु नासिर जंगला त्याचा पुतण्या व निझाम-उल-मुल्कचा नातू मुझफ्फर जंग याने आव्हान दिले. हैदराबादच्या तख्तावरून वा सिंहासनावरून हा वाद चालू असताना कर्नाटकचा तत्कालीन नवाब अनवरउद्दीन याला पूर्वीचा नवाब दोस्त अलीचा जावई चंदा साहेब याने आव्हान दिले. अशातऱ्हेने दक्षिण भारतातील दोन मोठ्या मुस्लीम राज्यांमध्ये भाऊबंदकी वा सत्तासंघर्ष सुरू झाला व याचा फायदा फ्रेंचांनी व ब्रिटिशांनी घेण्याचे ठरविले. त्यामुळे दुसरे कर्नाटक युद्ध उद्भवले असे म्हणणे वावगे ठरू नये.

ड्यूप्लेने हैदराबादच्या सत्तासंघर्षात आपले वजन मुझफ्फर जंगच्या पारड्यात टाकले; तर कर्नाटकच्या वादात चंदा साहिबला पाठिंबा दर्शविला. ड्यूप्लेने दक्षिण भारताच्या या सत्तासंघर्षात घेतलेली भूमिका पाहून ब्रिटिशांनी फ्रेंचांच्या विरोधात हैदराबादेत नासिर जंगला तर कर्नाटकात अनवरउद्दीनला पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे फ्रेंच व ब्रिटिशांमध्ये तंटा होणे अटळ होते. मुझफ्फर जंग, चंदा साहिब व फ्रेंचांच्या एकत्रित सैन्याने वेल्लोरमधील (हे ठिकाण / हा जिल्हा उत्तर तामीळनाडूत आंध्र प्रदेशाच्या सीमेनजीक आहे) अंबूरच्या लढाईत १७४९ (ऑगस्ट महिन्यात) अनवरउद्दीनचा पराभव करून त्याला ठार केले व १७५० च्या डिसेंबर महिन्यात एका चकमकीत नासिर जंग मृत्यू पावला. अशाप्रकारे फ्रेंचांच्या मदतीने मुझफ्फर जंग व चंदा साहिब यांना आपली राजकीय व सत्तेची महत्त्वाकांक्षा पूर्ण करता आली. ड्यूप्लेच्या मदतीने मुझफ्फर जंग हैदराबादचा शासक बनला व त्याने ड्यूप्लेला कृष्णा नदीच्या दक्षिणेकडील प्रदेशांचा सुभेदार वा प्रांताधिकारी घोषीत केले. तसेच नॉर्थन सरकार्सचा (Northern Circars - साधारणतः आंध्र प्रदेशातील राजमुंद्री, गुंटूर तसेच ओरिसाचा काही भाग) काही प्रदेश देखील फ्रेंचांच्या स्वाधीन केला. त्याचप्रमाणे राजधानी हैदराबादेत बुसी (Bussi) नामक अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली फ्रेंच सैन्य तैनात करण्यात आले. तसेच १७५१ साली चंदा साहिब कर्नाटकचा नवाब बनला. यावरुन १७५१ पर्यंत दक्षिण भारतात ड्यूप्ले व फ्रेंच यांना प्रचंड यश मिळाले होते असे निदर्शनास येते. परंतु अनवरउद्दीनचा पुत्र मोहम्मद अली याने त्रिचिनोपोली (सध्याचे तामीळनाडू) येथे आश्रय घेतला होता. मोहम्मद अलीला ब्रिटिशांची मदत होती. फ्रेंचांनी व चंदा साहिबने त्रिचिनोपोलीत मोहम्मद अलीला वेढा टाकून हरविण्याचा प्रयत्न केला. यामुळे रॉबर्ट क्लाईव्हने त्रिचिनोपोलीतील फ्रेंच व चंदा साहिबच्या सैन्यावर दबाव आणून त्यांचे लक्ष विचलीत करण्यासाठी गव्हर्नर सॉंडर्सला चंदा साहिबची राजधानी ॲरकोट (Arcot - हे ठिकाण तामीळनाडूतील राणीपेठ जिल्ह्यात आहे. अगोदर हा जिल्हा वेल्लोर जिल्ह्याचा एक भाग होता) येथे पाठविले. यामागे क्लाईव्हचा तर्क

असा होता की, ॲरकोटवर हल्ला चढविल्यावर आपल्या राजधानीचे रक्षण करण्यासाठी चंदा साहिब त्रिचिनोपोली सोडून राजधानीकडे धाव घेईल वा निदान काही सैन्याची कुमक तरी पाठवून देईल. अशाप्रकारे रॉबर्ट क्लाईव्हने दोनशे-दहा सैनिकांसह ॲरकोटवर चढाई केली व १७५१ च्या ऑगस्ट महिन्यात ॲरकोट जिंकले. चंदा साहेबने त्रिचिनोपोलीवरून पाठविलेले चार हजार सैनिकसुद्धा ॲरकोटचे रक्षण करू शकले नाहीत. रॉबर्ट क्लाईव्हने येथे इतिहासात प्रसिद्ध असलेल्या त्रेपन्न दिवसाच्या वेढ्याला समर्थपणे तोंड दिले. ब्रिटिशांचा ॲरकोट येथील विजय या संपूर्ण लढ्याला कलाटणी देणारा ठरला. त्यामुळे फ्रेंचांचे व चंदा साहिबचे खच्चीकरण झाले. तसेच १७५२ मध्ये स्ट्रिंगर लॉरेन्स याच्या नेतृत्वाखाली फ्रेंचांचा त्रिचिनोपोली येथे पाडाव झाला व जून १७५२ मध्ये फ्रेंचांनी त्रिचिनोपोलीत ब्रिटिशांसमोर शरणागती पत्करली. तसेच तंजावरच्या राजाने चंदा साहिबला ठार केले. त्रिचिनोपोलीतील फ्रेंचांच्या या पराभवामुळे फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांनी ड्यूप्लेला माघारी बोलावून घेतले व १७५४ साली गोडेहू (Godeheu) याची भारतातील फ्रेंचांच्या प्रदेशाचा गव्हर्नर जनरल म्हणून नियुक्ती केली. जानेवारी १७५५ मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी व फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीच्या दरम्यान शांती करार झाला. ब्रिटिशांच्या मदतीने मोहम्मद अली कर्नाटकचा नवाब झाला. परंतु हैदराबादच्या राज्यात अजूनही फ्रेंचांचे अस्तित्व टिकून होते. तेथील फ्रेंच अधिकारी बुसी याने हैदराबादचा नवीन शासक सालाबत जंग याच्याकडून फ्रेंचांसाठी अजून जास्त सवलती प्राप्त करून घेतल्या. नॉर्थन सरकार (आंध्र प्रदेश) मधील तीस लाख रुपये एवढा वार्षिक महसूल प्राप्त होणारा प्रदेश देखील फ्रेंचांना देण्यात आला. परंतु दुसऱ्या कर्नाटक युद्धानंतर फ्रेंचांची एकंदरीतच भारतातून पिछेहाट होण्यास सुरुवात झाली व ब्रिटिशांचे पारडे जड होऊ लागले असे म्हणणे वावगे ठरू नये.

फ्रेंच व ब्रिटिशांमधील भारतातील तिसरे कर्नाटक युद्ध १७५८ ते १७६३ या कालावधीत झाले. हे युद्धे देखील युरोपमधील एका मोठ्या युद्धाचा भारतातील परिणाम होता. युरोपातील हे युद्ध सेव्हन इयर्स वॉर (१७५६-६३ - सात वर्ष चाललेले युद्ध) म्हणून प्रसिद्ध आहे. या युद्धात फ्रान्स, स्विडन, स्पेन, रशीया आदी राष्ट्रे ग्रेट ब्रिटन, हानोव्हर, प्रशिया, पोर्तुगाल व त्यांच्या इतर मित्र राष्ट्रांविरोधात लढत होती. या काळातच भारतात घडलेली मोठी घटना म्हणजे १७५७ ची प्लासीची लढाई होय. ही लढाई ब्रिटिश सैन्य व बंगालचा तत्कालीन नवाब सिराजउद्दौला याच्या सैन्यात झाली. ब्रिटिश सैन्याचे नेतृत्व रॉबर्ट क्लाईव्ह करत होता तर सिराजउद्दौलाच्या सैन्याचे नेतृत्व त्याचा सेनापती मीर जाफर करत होता. ब्रिटिशांनी प्लासीच्या लढाईत सिराजउद्दौलाच्या सैन्याचा पाडाव करून त्याचा काटा काढला व आश्चर्याची बाब म्हणजे या लढाईनंतर मीर जाफरलाच बंगालचा नवाब म्हणून नियुक्त केले. मीर जाफर हा फक्त नामधारी नवाब होता व बंगालची सूत्रे खऱ्या अर्थाने ब्रिटिशांच्या ताब्यात गेली. तर आपला मुळ मुद्दा होता की, १७५८ ते १७६३ दरम्यान भारतात तिसरे कर्नाटक युद्ध लढले गेले. काऊंट डी. लॅली (Count de Lally) याच्या नेतृत्वाखाली फ्रेंच सरकारने भारतामधील फ्रेंचांना ब्रिटिशांविरुद्ध कुमक पाठविली. काऊंट डी लॅली १७५८ च्या एप्रिल महिन्यात भारतात येऊन थडकला. काऊंट डी लॅलीने फोर्ट सेंट डेव्हीडवर (पाँडिचेरीच्या दक्षिणेला) हल्ला चढवून तो काबीज केला व तंजावरवर ती हल्ला केला. तंजावर वर ती हल्ला करण्याचे कारण की, तंजावरचा राजा फ्रेंचांना छप्पन लाख रुपये एवढी रक्कम देणे होता. परंतु फ्रेंचांना या मोहीमेत म्हणावे तेवढे यश मिळाले नाही व त्यांच्या प्रतिष्ठेला त्याचा धक्का पोहोचला. यानंतर लॅलीने मद्रासला वेढा घालण्याचे ठरविले. परंतु त्याचवेळी मद्रासच्या रक्षणासाठी ब्रिटिशांचे मोठे आरमारदल हजर

झाल्यामुळे लॅलीचे मद्रासला वेढा घालण्याचे मनसुबे उधळले गेले. लॅलीने याचवेळी फ्रेंचांचा हैदराबादमधील प्रतिनिधी बुसी यास तेथून बोलावून घेतले. पिकॉकच्या नेतृत्वाखालील ब्रिटिश आरमाराने डि. अॅक (D'Ache) च्या नेतृत्वाखाली लढणाऱ्या फ्रेंच आरमाराचा तीन वेळा धुव्वा उडवला व त्याला भारताच्या सागरी हद्दीतून पिटाळून लावले. अशातऱ्हेने ब्रिटिशांना भारताच्या पूर्व सागरी तटावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यात यश आले. सर आयर कूट (Sir Eyre Coote) याच्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांनी फ्रेंचांचा वांदीवाशच्या (Wandiwash - सध्याचे नाव – वंदवासी – हे ठिकाण तामीळनाडूमध्ये तिरुवन्नमलाई आहे) लढाईमध्ये (१७६०) धुव्वा उडवला. तसेच ब्रिटिशांनी बुसीला ताब्यात घेतले. शेवटी १७६१ च्या जानेवारी महिन्यात फ्रेंचांना पाँडिचेरी गाठून तेथे आश्रय घेण्याची नामुष्की आली. ब्रिटिशांनी पाँडिचेरीला जवळ–जवळ आठ महिने घेराव घालून नाकेबंदी केली व फ्रेंचांना शरण येण्यास भाग पाडले. त्यानंतर फ्रेंचांना माहे (केरळ) व जिंजी (तामीळनाडू) देखील गमवावे लागले. अशाप्रकारे फ्रेंच व ब्रिटिशांमधील भारतातील संघर्षाची ही तिसरी फेरी ब्रिटिशांनी निर्विवादपणे जिंकली असे म्हणणे वावगे ठरू नये. शेवटी पॅरीसच्या तहानुसार (१७६३) पाँडीचरी व इतर थोडेफार प्रदेश फ्रेंचांना देण्यात आले. परंतु त्यांनी या ठिकाणी संरक्षणाच्या दृष्टीने तटबंद्या बांधू नयेत असे ठरले. तिसऱ्या कर्नाटक युद्धाने फ्रेंचांचे भारतातील साम्राज्य विस्ताराचे मनसुबे कायमचे उधळले व फ्रेंचांनी भारतातून काढता पाय घेऊन ब्रिटिशांसाठी येथे रान मोकळे सोडले. येथे अजून एक मुद्दा मांडावासा वाटतो व तो असा की, सात वर्षांच्या युद्धामुळे ब्रिटिशांना भारतात फायदा झालाच; परंतु त्यांनी उत्तर अमेरिकेत कॅनडात देखील आपले पाय मजबूत रोवले. ब्रिटिशांनी या युद्धानंतर फ्रेंचांना कॅनडातून जवळपास हद्दपार करून टाकले.

फ्रान्ससारख्या युरोपमधील बलाढ्य देशाला भारतात हार का अनुभवावी लागली या प्रश्नाचे उत्तर शोधत असताना आपणास अनेक घटक वा कारणे सापडतात. फ्रेंचांच्या भारतातील पराभवास कारणीभूत सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे फ्रान्सने युरोपीय खंडाच्या सत्तासंघर्षात व राजकारणात नको तेवढा घेतलेला रस हे होय. फ्रान्सची पूर्वीपासून युरोपमध्ये आपला दबदबा प्रस्थापित करून स्वामित्व सिद्ध करण्याची महत्त्वाकांक्षा होती. त्यामुळे फ्रान्सचे सम्राट आपली शक्ती, पैसा व वेळ युरोपच्या राजकीय घराण्यांच्या तंट्यात सहभागी होऊन वाया घालवत असत. फ्रान्सला जसे युरोपवर आपली सत्ता गाजवायची इच्छा होती; त्याचप्रमाणे जगभर आपल्या वसाहती वा साम्राज्य विस्तार करण्याचीदेखील मनीषा होती. त्यामुळे फ्रान्सचे बळ युरोप व सातासमुद्रापलीकडील प्रदेश अशा दोन्ही ठिकाणी विभागले गेले. याउलट ब्रिटिशांनी युरोपच्या सत्तासंघर्षात फक्त सत्ता संतुलन राखण्याच्या उद्देशाने व तेवढ्या पुरताच सहभाग घेतला व आपली पूर्णशक्ती सातासमुद्रापार अमेरिका, आफ्रिका, आशिया व इतर अनेक भागांत आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी वापरली.

वरील कारणाप्रमाणेच ब्रिटिश, साम्राज्य विस्तारात युरोपातील कुठल्याही सत्तेपेक्षा जास्त यशस्वी ठरले याचे अजून एक कारण म्हणजे तेथील प्रबळ संसदीय प्रणाली हे होय. ब्रिटनला 'लोकशाहीची जननी' म्हटले जाते. तेथील शासन व राजेदेखील देशहितासाठी क्रियाशील असल्याचे जाणवते. याउलट फ्रान्सचे चौदावा लुई तसेच पंधरावा लुई यांच्यासारखे सम्राट युद्ध व स्वतःच्या चैनीत मश्गुल राहत असत व पैशाचा व संपत्तीचा चुराडा करत असत. पंधराव्या लुईसारखा राजा तर भोगविलासी / कामुक प्रवृत्तीसाठी प्रसिद्ध होता. चौदाव्या लुईच्या या पणतूने आपल्या राण्या, नाचे व केशभूषा करणाऱ्यांवर राज्याची अमाप संपत्ती उधळल्याचे

---

खूप माणसांची स्वप्ने या एका विचारामुळे अपूर्ण राहतात,– तो म्हणजे 'लोक काय म्हणतील?'

निदर्शनास येते. जेव्हा असे बेजबाबदार राजे विलासी जीवनात मग्न वा बेभान झालेले असतात तेव्हा त्यांच्या व त्या अनुषंगाने त्यांच्या देशाच्या नशिबी पराभव येणे क्रमप्राप्त ठरते यात वाद नाही.

येथे अजून एक मुद्दा लक्षात घेणे महत्त्वाचे आहे व तो असा की, फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी यांचे एकंदरीतच प्रशासन व कारभार चालविण्याची पद्धती यातील तफावत होय. फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीचा विचार केला तर ही कंपनी जवळ-जवळ फ्रान्सचे सम्राट चालवित असत असे म्हणणे वावगे ठरू नये. या कंपनीच्या भाग भांडवलापैकी अर्ध्याहून अधिक हिस्सा सम्राटाचा असे. त्यामुळे या कंपनीचे रोखेधारक वा भागधारक कंपनीच्या कारभाराकडे फारसे लक्ष घालत नसत. त्यांना राज्य म्हणजेच राजा, त्यांच्या भागभांडवलाच्या गुंतवणुकीवर लाभांश देत असे. १७२५ ते १७६५ या कालावधीत तर भागधारकांची बैठक झाल्याचे देखील निदर्शनास येत नाही. अनेकदा फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीवर कर्जाने पैसा घेऊन वा भांडवल उभे करून व्यापार करण्याची नामुष्की आल्याचे निदर्शनास येते. ही कंपनी आपली तंबाखूच्या व्यापारावरील मक्तेदारी व लॉटरीच्या जुगाराच्या धंद्यावर वा उद्योगावर कशीबशी तग धरून होती असे म्हणणे वावगे ठरू नये. याउलट ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थिती होती. ही कंपनी पूर्णतः व्यापारी तत्त्वावर चालविली जात असे. कंपनीच्या व्यापारविषयक धोरणाविषयी व कंपनीने हस्तगत केलेल्या भू-प्रदेश वा वसाहतींविषयक राजकीय निर्णय घेण्याची देखील पूर्ण मुभा कंपनीच्या संचालक मंडळाला होती. ब्रिटनची संसद वा राजे ईस्ट इंडिया कंपनीला पूरक वा पोषक असे निर्णय व नीती-धोरण बनवित असत. उदाहरणच द्यावयाचे झाले तर, आपण पाहिले की, ऑस्ट्रीयाच्या राजगादीवरून झालेल्या युद्धसमाप्तीनंतर ब्रिटिनच्या सत्ताधाऱ्यांनी भारतातील मद्रास हे ठिकाण ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीसाठी मागून घेतले. तसेच ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे संचालक राजकारणापेक्षा व्यापाराला जास्त महत्त्व देत असत. त्यामुळे त्यांचे निर्णय कंपनीला जास्तीत जास्त आर्थिक लाभ व नफा कसा होईल हे नजरेसमोर ठेवून घेतले जात असत. त्यामुळे अर्थात, ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीकडे आर्थिक स्रोत मोठ्या प्रमाणात होता व या आर्थिक सदृढतेचा फायदा त्यांना फ्रेंचांसोबत (प्रामुख्याने भारतात) झालेल्या युद्धांसाठी, नव्हे तर ती युद्धे जिंकण्यासाठी मोठ्या प्रमाणात झाला असे म्हणणे संयुक्तिक ठरेल.

ब्रिटिशांच्या भारतातीलच नव्हे तर जगभरातील विजयश्रीस कारणीभूत महत्त्वाचा घटक म्हणजे त्यांचे प्रबळ आरमार हे होय. आपण युनायटेड किंगडम ऑफ ग्रेट ब्रिटन व आर्यलँड (आपण अनेकदा या देशाला इंग्लंड म्हणूनच संबोधतो. परंतु हा देश इंग्लंड, वेल्स, स्कॉटलंड व उत्तर आर्यलंड हे प्रांत मिळून बनलेला आहे) या देशाचे भौगोलिक स्थान पाहिले तर आपल्या लक्षात येते की, हा देश म्हणजे एक बेट आहे. या देशाच्या दक्षिणेला इंग्लीश खाडी, पश्चिमेला आयरिश समुद्र, उत्तरेला अटलांटिक महासागर तर पूर्वेला नॉर्थ सी (उत्तर समुद्र) आहे. त्यामुळे या देशाला जगाशी व खंडीय युरोपियन देशांशी संपर्क ठेवण्यासाठी जलमार्गाचा वापर करणे क्रमप्राप्त होते व त्यातूनच त्यांच्या प्रबळ आरमाराची निर्मिती झाली. बलशाली आरमाराच्या बळावरच इंग्लंडला साता समुद्रापलीकडे जाता आले, नव्हे तर जगातील विविध भागांत जाऊन तेथे आपल्या वसाहती स्थापन करता आल्या. इंग्लंड व फ्रान्स हे दोन देश तसे पाहता युरोपच्या राजकीय पटलावर बहुतांशवेळा एकमेकांचे स्पर्धक राहिलेले आहेत. या दोन देशांमध्ये अनेकदा युद्धे झालेली आहेत. अगदी १९ व्या शतकाच्या सुरुवातीस फ्रान्सचा सम्राट बनलेल्या व बराचसा युरोप पादाक्रांत करणारा नेपोलियन देखील इंग्लंडचा पराभव

---

या दोन गोष्टींमुळे जग तुम्हाला ओळखते, तुमच्याजवळ काहीच नसतांना तुम्ही बाळगलेला संयम आणि तुमच्याजवळ सर्वकाही असतांना तुम्ही दाखवलेला रुबाब!

करू शकला नाही याचे मुख्य कारण म्हणजे इंग्लंडकडे असलेली आरमाराची शक्ती हे होय. त्यामुळे इंग्लंडला भारतात फ्रेंचांविरुद्ध जे यश मिळाले त्याचे श्रेय त्यांच्याकडे असलेल्या बलशाली आरमाराला नक्कीच जाते. अर्थात सुरुवातीच्या काळात फ्रेंच आरमाराने ब्रिटिश आरमाराला जेरीस आणले व त्याचा पराभव देखील केला. परंतु हा पराभव तात्पुरत्या स्वरुपाचा होता व त्यावेळी युरोपात इंग्लंड व फ्रान्समध्ये शांतता प्रस्थापित झाली होती व त्याकाळात इंग्लंडचे आरमार तात्पुरत्या कालावधीसाठी कृतीबाहेर होते. परंतु सात वर्षीय युद्धात फ्रान्सच्या आरमाराचे कंबरडे मोडले गेले व ब्रिटिशांच्या आरमाराला उभारी आली. तसेच डिॲकने (D' Ache) भारताच्या पूर्व किनाऱ्यावरून काढता पाय घेऊन ब्रिटिश आरमाराला मोकळे रान सोडले. इंग्लंडच्या तत्कालीन शासकांनी देखील त्यांचे आरमार मजबूत करण्यावर भर दिल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे कर्नाटक युद्धांच्या व प्रामुख्याने तिसऱ्या कर्नाटक युद्धाच्या निर्णायक व शेवटच्या टप्प्यात ब्रिटिश आरमाराने जोरदार मुसंडी मारून ब्रिटिश भूदलाला छान मदत तर केलीच, परंतु त्याचसोबत भारतातील फ्रेंचांचा त्यांच्या मायभूमीशी व इतर फ्रेंच वसाहतींशी संपर्क तोडून टाकला. त्यामुळे फ्रेंचांची स्थिती एकप्रकारे दक्षिण भारतात खिंडीत अडकल्यासारखी झाली व ब्रिटिशांना त्यांचा निर्णायक पराभव करता आला.

ब्रिटिशांकडे असलेली आर्थिक ताकद हा एक घटक त्यांना फ्रेंचांचा पराभव करण्यास मदत करून गेला. आपण पाहिलेच की, १७५७ मध्ये प्लासीची लढाई झाली व बंगालसारखा समृद्ध व संपन्न प्रदेश ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली गेला. त्यामुळे कर्नाटक युद्ध लढण्यासाठी ब्रिटिशांकडे धनसंपत्तीची कमतरता नव्हती. नेमकी याउलट आर्थिक स्थिती फ्रेंचांची होती. त्याचप्रमाणे ब्रिटिशांना मुंबईहून देखील मदत प्राप्त होत होती. युद्ध लढत असताना अमाप खर्च करावा लागतो. त्यामुळे ज्याची आर्थिक स्थिती सदृढ असते त्याच देशाची युद्ध जिंकण्याची शक्यता जास्त असते. नेमके हेच ब्रिटिशांच्या बाबतीत घडले.

युद्ध जिंकण्यासाठी कुशल नेतृत्वाचीदेखील गरज असते. सैन्य शत्रूविरुद्ध लढत असते. परंतु सैन्याचे आत्मबल वाढविणारा, त्यांना प्रेरणा देणारा व युद्धनीती आखण्यात निपुण असणारा नेता मिळणे तेवढेच आवश्यक असते. असे झाल्यावर सैन्य त्वेषाने लढते व शत्रूचा पराभव करून विजयश्री खेचून आणते. ब्रिटिशांकडे अशाप्रकारचे नेतृत्व रॉबर्ट क्लाईव्ह, मेजर स्ट्रिंगर लॉरेन्स, थॉमस सॉंडर्स यांच्या रूपाने होते. या अधिकाऱ्यांनी कर्नाटक युद्धाच्या विविध लढायांत सुरेख कामगिरी केल्याचे निदर्शनास येते.

ड्यूप्ले व बुसी हे जरी करारी पुरुष असले तरी ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या तुलनेत ते मुत्सद्दीपणात व युद्धनीतीत कमी पडले असे म्हणणे वावगे ठरू नये. काऊंट डी लॅली हा तर भडक माथ्याचा सेनापती होता. त्याला पाँडिचेरीतील फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीचे नोकर-चाकर म्हणजे भ्रष्ट लोक वाटत असत. त्याचा त्यांना शिक्षा करण्याकडे कल असे; नव्हे त्यांना शिक्षा करून वठणीवर आणले पाहिजे असे त्याचे मत होते. त्यामुळे ब्रिटिशांनी जेव्हा त्याचा पराभव केला तेव्हा या फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरदारांना आनंदच झाला होता. जेव्हा अशा प्रकारची परिस्थिती असते तेव्हा रणांगणांवर विजय प्राप्त करणे कठीणच नव्हे तर जवळ जवळ अशक्य असते.

ड्यूप्ले हा कर्तृत्ववान पुरुष असला तरी त्याने फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापाराकडे व एकूणच आर्थिक स्थितीकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास येते. फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीची आर्थिक स्थिती खालावत जात असताना भारतातील राजकीय संघर्षात सहभागी

होऊन युद्ध करण्याचे त्याने अवलंबिलेले धोरण चुकीचे होते असे म्हणणे वावगे ठरू नये. तो अनेकदा फ्रेंचांना भारतात आलेल्या अपयशाविषयीची माहिती फ्रेंच सम्राट व राज्ययंत्रणेला देत नसे. त्यामुळे त्यांना भारतात फ्रेंच अडचणीत सापडलेले असताना वेळेत मदत पाठविणे जमले नसावे असा तर्क काढणे अयोग्य ठरणार नाही.

वरील सर्व विवेचनावरुन एकंदरीतच, फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीने भारतात आपले पाय रोवण्याचा असफल प्रयत्न केल्याचे निदर्शनास येते. सुरुवातीच्या काळात त्यांना काही प्रमाणात यश आले. परंतु आरमार, राजकीय मुत्सद्देगिरी व डावपेच, तसेच कुशल नेतृत्व याबाबतीत फ्रान्स हा देश इंग्लंडच्या तुलनेत फारच मागे पडला व त्याचा परिणाम म्हणून त्यांचा ब्रिटिशांनी भारतात पराभव करून त्यांना येथून जवळ-जवळ कायमस्वरुपी हद्दपार केले. एवढेच नव्हे, तर फ्रेंचांना कॅनडादेखील गमवावा लागला. नंतरच्या काळात नेपोलियनसारख्या शूरवीर सम्राटाला व सेनापतीला देखील इंग्लंडला नमवता आले नाही. यातून ब्रिटिशांचे खरे सामर्थ्य निदर्शनास येते. जर फ्रेंचांना १८ व्या शतकातील भारतातील कर्नाटक युद्धांत ब्रिटिशांना दक्षिण भारतात हरविण्यात यश आले असते तर भारताचा इतिहास वेगळाच असता असे म्हणावे लागेल.

**संदर्भ**

अ न्यू लूक ॲट मॉर्डर्न इंडियन हिस्ट्री : बी. एल. ग्रोव्हर अलका मेहता

मॉर्डन इंडिया : व्ही. डी. महाजन

**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)

१८४८ साली मुंबई शहरात 'ज्ञानप्रसारक सभा' या नावाची एक संस्था स्थापन करण्यात आली. मराठी भाषेतून विज्ञान प्रसार करणे हे त्या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. केरूनाना या संस्थेचे सक्रीय कार्यकर्ते होते. विज्ञान प्रसाराचे कार्य त्यांनी जन्मभर केले. १९मार्च १८८४ साली वयाच्या ६० व्या वर्षी त्यांनी इहलोकीची यात्रा संपवली. म्हणून १९ मार्च हा त्यांचा स्मृतीदिन. त्यांचे विज्ञान प्रसाराचे कार्य अलौकिक आहे. परंतु या क्षेत्रातील लोकांनी त्यांच्या कार्याची फारशी दखल घेतली नाही. या महान व्यक्तीला अभिवादन करता यावे आणि त्यांच्या कार्याची वाचकांना माहिती करून देता यावी एवढ्याचसाठी हा प्रयत्न केला.

**थोर महात्मे होऊन गेले, चरित्र त्यांचे पहा जरा ।**
**आपण त्यांच्या समान व्हावे, हाच सापडे बोध खरा।।**

**- डॉ. सुधाकर आगरकर**

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# कला आणि व्यक्तिमत्त्व

*कला आणि व्यक्तिमत्त्व एकमेकांना पूरक असतात. याचे विश्लेषण या लेखात विशद करण्यात आले आहे*
*– संपादक*

मानवी जीवनात कलेला अत्यंत महत्त्व आहे. कला माणसाचे जीवन समृद्ध बनवते. काही माणसं जन्मतःच काही कलागुण अंगी घेऊनच जन्माला येतात. कलेतून माणसाचे व्यक्तिमत्त्व बहरत जाते किंवा व्यक्तिमत्त्वच तसं असतं, की जो ती कला जोपासून आपली कला फुलवत असतो. म्हणजेच काय तर, कला आणि व्यक्तिमत्त्व ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मुळात व्यक्तिमत्त्व म्हणजे काय? हे पाहू....

सर्वच व्यक्ती आपल्या दैनंदिन जीवनात व्यक्तिमत्त्व या शब्दाचा वापर अगदी सहजपणे करताना आढळतात. निरनिराळ्या व्यक्तींच्या व्यक्तीमत्त्वासंबंधीच्या कल्पना निरनिराळ्या असतात. सर्वसाधारणपणे व्यक्तिमत्त्वाचा संबंध व्यक्तीच्या शारीरिक ठेवणीशी लावला जातो. व्यक्तीची छाप इतरांवर जशी पडेल त्याप्रमाणे व्यक्तिमत्त्वाचे वर्णन केले जाते. म्हणजेच व्यक्तीच्या शारीरिक ठेवणीबरोबर तिची राहणी, वागणे, बोलणे, चालणे या सर्वांचाच अंतर्भाव व्यक्तीमत्त्वात केला जातो.

व्यक्तिमत्त्वाचा personality हा इंग्रजी शब्द persona या लॅटिन शब्दापासून आलेला आहे. persona याचा अर्थ मुखवटा असा होतो. त्यातूनच रोमन लोकांनी या शब्दाला व्यक्ती कशी दिसते हा अर्थ दिला व त्यातूनच personality हा शब्द बनला आहे. नॉर्मन मन यांच्या मते व्यक्तीचा बांधा, वर्तन, गरजा, अभिरुची, अभिवृत्ती, क्षमता यांचे वैशिष्ट्यपूर्ण संघटन म्हणजे व्यक्तिमत्त्व होय.

एखाद्याचे व्यक्तिमत्त्व ठरविताना किंवा त्याबद्दल काही भाष्य करताना त्या व्यक्तीची शारीरिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक इ. सर्व प्रकारची वैशिष्ट्ये विचारात घ्यावी लागतात. कारण या सर्वांच्या एकत्र येण्यानेच व्यक्तिमत्त्व बनते. कोणत्याही व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व हे दोन प्रकारच्या गोष्टी एकत्र येऊन घडते.

१ प्रत्येक व्यक्तीत आढळणारे व सहसा न बदलणारे शास्त्रीय गुणविशेष.

२ एखाद्या व्यक्तीची स्वतःची अशी खास वैशिष्ट्ये.

कला म्हणजे काय? तर कला मधील कल हा मूळ संस्कृत शब्द आहे.कल याचा अर्थ प्रकट करणे. कलेचा संबंध माणसाच्या आचार, विचार, भावना व निसर्गातील घटकांशी असतो. म्हणजेच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाशी असतो.

'क्रँलिक यांनी कलेचे पंचीकरण केलेले आहे. त्यांनी पंचेंद्रियांना सौंदर्य संवेदना देणाऱ्या पंचकला असे पाच भेद पाडले आहेत. १ स्वादकला, २ गंधकला, ३ स्पर्शकला, ४ श्रवणकला, ५ दर्शनकला. आपल्या मनात एकता व अनेकता यांची जाणीव उत्पन्न करणे हे कलेचे खरे स्वरूप आहे. कला क्षेत्रात बुद्धीमत्तेबरोबरच विशिष्ट व्यक्तिमत्त्वाची आवश्यकता असते. उदाहरणार्थ जाहीरात, मार्केटिंग क्षेत्रात बोलकी व इतरांत मिसळून काम करणारी बहिर्मुख व्यक्तिमत्त्वाची व्यक्ती उपयुक्त ठरते. कलेचे ज्ञान असणाऱ्या व कला प्रस्तुत करणाऱ्या व्यक्तीस कलाकार किंवा कलावंत म्हणतात.

कला आणि त्याचं व्यक्तिमत्त्व या एकाच नाण्याच्या

---

भूक आहे तेवढे खाणे ही प्रकृती, भूक आहे त्यापेक्षा जास्त खाणे ही विकृती आणि वेळेप्रसंगी स्वतः उपाशी राहून दुसऱ्याची भूक भागवणे ही संस्कृती.

दोन बाजू आहेत. मग ती कला कोणतीही असो. संवाद, लेखन, चित्रकला, संगीत, नृत्य, वादन, गायन, सिनेमा अशा कितीतरी कलांद्वारे जेव्हा प्रवृत्तीला व्यक्त करायचं असतं तेव्हा कलाकार, कला आणि व्यक्तिमत्त्व यांच्यातलं गूज म्हणजे ती प्रतिभा बहराला येत असते.

आज कोणतेही वर्तमानपत्र किंवा मासिक घ्या. त्यांत रंगभूमी किंवा संगीत यांना थोडीतरी जागा दिलेली आढळतेच. प्रत्येक अंकात एखाद्या विशेष चित्राचे किंवा एखाद्या कलात्मक प्रदर्शनाचे वर्णन दिसतेच. वेगवेगळ्या कलेविषयी अभिप्राय सदैव वाचायला मिळत असतात. काही व्यक्तिमत्त्व अशी असतात की त्यांचा दूरस्थ सहवासही आनंददायी असतो. त्यांमधील क्षण आयुष्यभरासाठी उपयोगी पडतात. उदा. पु. ल. देशपांडे, लता मंगेशकर, सचिन तेंडुलकर, माधुरी दीक्षित, किशोर कुमार, मधुबाला, राजा रविवर्मा, झाकीर हुसेन, माडगुळकर, सुधीर फडके अशा कितीतरी व्यक्ती आहेत ज्या आपल्या कायम स्मरणात राहतात ते त्यांच्या कलापूर्ण व्यक्तिमत्त्वामुळेच. या आणि अशा कितीतरी व्यक्ती प्रसिद्धी व पैसा यासाठी काम करण्यापेक्षा विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन काम करतात. कलाप्रेमी व्यक्तींचं जीवन नेहमीच आव्हानांनी भरलेले असते आणि तरीही ताजेतवाने असते.

कला नेहमीच कष्टसाध्य व प्रयत्नसाध्य असते. कला म्हटली की, त्या ठिकाणी काही तांत्रिक अंगे आली. स्पष्टता, सुगमता, आटोपशीरपणा, नम्रता, विचारांची स्वतंत्रता, बोलण्यातील मधुरता, कुशलता, तन्मयता, आशयघनता अशा विविध बाबी कोणत्याही कलेत महत्त्वपूर्ण असतात. कोणतीही कला सादरीकरणापूर्वी आत्मपरीक्षण करणे तितकंच महत्त्वाचं असतं. आत्मनिरीक्षण किंवा आत्मशोध आत्मविश्वासाला प्रेरक व मार्गदर्शक ठरतो. सहभाग, सहकार्य, प्रार्थना, परोपकार हे आत्मविश्वासाचे चार खांब आहेत. परिपूर्ण ज्ञान, ज्ञानाचे उपयोजन, आत्मसंशोधन व यातून स्वाभाविकरित्या स्वतःच्या श्रेष्ठतेबद्दल निर्माण होणारा विश्वास म्हणजे आत्मविश्वास होय.

प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीपासून भिन्न असते. तुमचे व्यक्तिमत्त्व तुमची अनेक व्यक्तीवैशिष्ट्ये किती प्रमाणात समरस झालेली आहेत यावर अवलंबून असते. निसर्गाने माणसाला इतर प्राणीमात्रांपेक्षा बुद्धिवान ठरविले आहे. त्या बुद्धीच्या जोरावर मानवाने सर्वच क्षेत्रात प्रगती साधली आहे. पण प्रत्येकच व्यक्तीच्या अंगी सर्वच कलागुण असतील असे नाही. एखाद्याचा आवाज चांगला असेल, एखाद्याला उत्तम चित्र काढता येते, कोणी वाद्य चांगले वाजविते, कोणी उत्तम गातं इ. गरज आहे फक्त आत्मपरीक्षणाची, स्वतःमधील सुप्त कलागुण ओळखण्याची.

'कलावंत समाजाला नेहमीच समृद्ध करत असतात. कला आणि व्यक्तिमत्त्व एकमेकांना पूरक असतात म्हणूनच कलेतून माणूस घडतो आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वातून कला बहरत जाते'.

**– मनीषा चव्हाण**
शालेय ग्रंथपाल, ठाणे
दूरध्वनी – ९१७२४४८८७८
Email : manisha.chavan801gmail.com

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

# उगवत्या सूर्याच्या देशातून

*विद्या प्रसारक मंडळाने जपान देशाचा अभ्यास दौरा आयोजित केला होता. या अभ्यास दौऱ्याचे अनुभव या लेखात विशद करण्यात आले आहे - संपादक*

"Travelling it leaves you speechless, then turns you into a storyteller. Ibn Battuta"

जपान व भारताचे तसे मधुर संबंध राहिले आहेत. 'बुद्ध' हा या दोन देशांना जोडणारा अजोड दुवा आहे. हजारो वर्षांपूर्वीची बुद्ध मंदिरे पाहून आपण अवाक् होऊन जातो. बुद्ध मंदिरांशिवाय जपानमध्ये अशा अनेक निसर्गरम्य गोष्टी आहेत की ज्याचा कुठल्याही भारतीय माणसाला हेवा वाटावा. जपान भेटीचा हा अनोखा अनुभव मागच्या महिन्यात एका अभ्यास दौऱ्यावर गेलो असताना मिळाला. ठाण्याच्या विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ. विजय बेडेकर यांच्या पुढाकाराने जपानचा हा दौरा स्मरणात कायम राहील असाच होता.

जपानी भाषा, संस्कृती व तेथील विद्यापीठांचा अभ्यास करण्याच्या हेतूने मी जपान दौऱ्यात सहभागी झालो. तिथले संपन्न जलाशय, हिरवे गार डोंगर, अत्यंत नम्र, कष्टाळू आणि मितभाषी लोक जवळून अनुभवता आले. साहित्याचा अभ्यास करताना शिरीष पै यांचे नितांत सुंदर 'हायकू' वाचले होते. हायकूची मातृभूमी जपान आहे. मात्र केवळ तीन ओळींत जीवनाचा आशय सांगू शकणारी जपानी लोकांची प्रतिभा त्यांच्या मितभाषीपणातून आली असावी असं मला नेहमी वाटत राहतं.

मार्च व एप्रिल दरम्यान जपानमध्ये 'चेरी ब्लाजम' चा नयनरम्य सोहळा असतो. मात्र नोव्हेंबरमध्ये गेल्यामुळे तो पाहता आला नाही. जपानची एकूणच निसर्गकेंद्री (Ecocentric) जीवनपद्धती पाहून त्यांच्या रोजच्या जगण्यात निसर्गाला किती महत्त्व आहे हे कळतं. त्याचं उत्तम उदाहरण म्हणजे ग्रीन टी क्योटो, नारा व ओसाका या जपानमधील तीन महानगरांना भेट देण्याचा योग आला. विद्यार्थी व शिक्षकांचा मिळून १८ जणांचा आमचा गट होता. जपानच्या विमानतळापासून ते शासकीय आस्थापनांपर्यंत एक गोष्ट जाणवत राहते ती म्हणजे अत्यंत साधेपणाने केलेली सजावट. कुठेही भपकेबाजी वा बडेजाव नाही. आम्ही ज्या हॉटेलमध्ये उतरलो होतो ते हॉटेलही अगदी साधं व सुंदर होतं. जागेचा योग्य वापर कसा करायचा हे जपानी लोकांकडून शिकायला हवं.

क्योटो शहर पहायला आम्ही बाहेर पडलो. कितीही रस्त्यावर गर्दी असली तरी कुठेही 'ट्राफिक जाम' पाहिला नाही. सगळीकडे असणारी स्वच्छता डोळ्यांत भरत होती. जपानच्या मूळ धर्माला 'शिंतो' (Shinto) असं संबोधतात. निसर्गपूजा हा या धर्माचा गाभा. आमच्या प्रवासात काही शिंतो धर्माची मंदिरं देखील पाहता आली. 'कुशिमी इनारी' मंदिर हे क्योटोतील सुंदर शिंतो मंदिर आहे. ही देवी 'इनारी' पर्वतावर वसली आहे. हजारो लाल रंगाची आयताकृती दारं या मंदिराच्या प्रवेशाला लावली आहेत.



पुण्यातील गणेशखिंडीतील ‘चतुश्रृंगी देवी मंदिरा’ला भेट दिल्याचा भास झाला. सुंदर जपानी मुली ‘किमोनो’ हा त्यांचा पारंपरिक वेश परिधान करून ‘फुशिमी इनारी’ मंदिरात आल्या होत्या. हिंदू व हिंदू स्थापत्यशास्त्र व जपानी स्थापत्यशास्त्राचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी ही छान जागा आहे.



क्योटोतील ‘किंकाकुजी’ मंदिर हे बुद्धमंदिर असून युनेस्कोने ‘वर्ल्ड हेरिटेज साईट’ घोषित केलं आहे. या मंदिराचा कळस हा सोन्याचा आहे. एका तलावाशेजारी सुंदर हिरवाईच्या अगदी मध्यभागात हे मंदिर पर्यटकांचं लक्ष वेधून घेतं.



क्योटोमध्ये अशीच अनेक सुंदर मंदिरं आहेत. ‘तोजी मंदिरातला पाच मजली अतिभव्य पागोडा’ अगदी डोळ्यांत भरून राहतो. जपानमध्ये होत असलेल्या सततच्या भूकंपामध्ये देखील हा ५७ मीटरचा पागोडा थोडादेखील हलला नाही. त्याची रचनाच मुळी लाकडी ओंडके एकमेकांत गुंफून केली असल्यामुळे इ.स. ८२६ पासून उभी असलेली ही वास्तू आजही तशीच उभी आहे. दक्षिण भारतीय मंदिरांच्या गोपूरांचा तोंडवळा काहीशा प्रमाणात जपानमध्ये आढळतो. ‘नृत्यमंडपम्’ च्या धरतीवर बुद्धमंदिरात ‘कोंडो हॉल’ आहेत. बुद्धाच्या प्रतिमांसोबत हिंदू वैदिक परंपरेतील मित्र, वरुण, कुबेर, ऐरावत, इंद्र आदी देवतांचा अंतर्भाव देखील जपानच्या हीनयान बुद्धधर्माने केलेला पहावयास मिळतो.

क्योटोच्या नयनरम्य फेरफटक्यानंतर ‘नारा’ या जपानच्या दुसऱ्या एका सांस्कृतिक राजधानीत आम्ही गेलो. ‘नारा’ हे शहर हरिणांसाठी प्रसिद्ध आहे. तिथल्या स्थानिक महानगरपालिकेच्या अधिकृत बोधचिन्हात हरीण कोरलेलं आहे. नारा या शहराचं एक सुंदर वैशिष्ट्य म्हणजे इथल्या कुठल्याही बौद्ध मंदिरात तुम्ही प्रवेश केला की तुम्हाला समजतं की, येथील कुठलंही मंदिर जवळपास १५०० वर्ष जुनं आहे. इथल्या प्रत्येक दगडाला हजारो वर्षांच्या इतिहास आहे. ‘शांतता’ व ‘स्वच्छता’ हे दोन परवलीचे शब्द आपणास वास्तवात अनुभवावयास मिळतात.

अरुण कोलटकर या ज्येष्ठ कविंच्या ‘जेजुरी’ या कविता संग्रहातील खालील ओळी ‘नारा’ मध्ये सारख्या आठवत राहतात.

> 'What is God, what is stone,
> the dividing line, if exists,
> is very thing, at Jejuri'



आपल्या नियतीचे मालक बना; पण परिस्थितीचे गुलाम बनू नका.

नारामध्ये होरयुजी, चुगुजी, जिकोश्नझेन मंदिर, याकुशिजी होर्युजी, तोशोडाइजी व तोडाइजी मंदिर पाहण्याचा योग आला. ही सर्व मंदिरं युनेस्कोने ‘वर्ल्ड हेरिटेज साईट’ म्हणून घोषित केली आहेत. पैकी तोडाइजी बुद्ध मंदिर हे इ.स.७३८ साली बांधलं आहे. जगातली सर्वात मोठी ब्राँझची ‘विरोचन’ बुद्ध मूर्ती इथे पहावयास मिळते. या मंदिर परिसरात हरिणांचा मुक्त संचार आहे. या परिसरात मला भारताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची शिल्पाकृती मिळाली. सारनाथमध्ये जो अशोकस्तंभ आहे त्याच धर्तीवर एक ‘अशोकस्तंभ’ तोडाइजी मंदिर परिसरात आहे. यावर लिहिलेला शिलालेख असं सांगतो की , २०३८ मध्ये जपानमध्ये बुद्धधर्माच्या शिकवणीला १५०० वर्षे पूर्ण होतील व जगभरातील बौद्ध भिक्खू येथे येऊन बुद्धाची प्रार्थना करतील! ‘हाना मात्सुरी’ अर्थात भगवान बुद्धाच्या वाढदिवशी एक हजार भिक्खूंचे पौरोहित्य करून एक मोठा उत्सव भरवण्यात येईल. नारामध्ये जपानच्या उदात्त संस्कृतीचे दर्शन घडवणारे वस्तुसंग्रहालय आहे.




शेवटच्या टप्प्यात आम्ही ‘ओसाका’ या जपानमधील व्यापार व उद्योगांच्या दृष्टीने महत्त्वाच्या शहरात गेलो. इथल्या ‘ओसामा विद्यापीठ’ या जगप्रसिद्ध शैक्षणिक संस्थेच्या हिंदी विभागाला आम्ही भेट दिली. पद्मश्री डॉ. तामिओ मिझोकामी यांनी आम्हाला निमंत्रित केलं होतं.

डॉ. मिझोकामी मागची ४० वर्षे ओसाका विद्यापीठात ‘हिंदी’ विषय शिकवतात. भारत सरकारने त्यांना नुकताच पद्मश्री हा सन्मान दिला. जपानमध्ये अत्यंत ‘शुद्ध’ हिंदीमध्ये झालेल्या स्वागताने आम्ही भारावून गेलो. ओसाकास्थित ‘ओसाका कॅसल’ व ‘ओसाका इतिहास संग्रहालय’ या दोन जगप्रसिद्ध वास्तू पहावयास मिळाल्या. इ.स. दुसऱ्या शतकापासून आतापर्यंतचा जपानचा सांस्कृतिक इतिहास हा या संग्रहालयात अत्यंत व्यवस्थित जतन करून ठेवला आहे.

या सांस्कृतिक भेटीदरम्यान जपानच्या एकूणच सांस्कृतिक जाणिवा जवळून अभ्यासता आल्या. जपानी जीवनात ‘टी सेरेमनी’ला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ‘टी सेरेमनी’ म्हणजे आलेल्या पाहुण्याला चहा देणे. मात्र ही चहा देण्याची पद्धत अत्यंत शास्त्रशुद्ध असून वज्रासनात बसून वनस्पतींनीयुक्त असा हिरवा चहा इथे अत्यंत आदराने दिला जातो. नम्रता, ऋजुता, सचोटी, स्वच्छता, मितभाषिता, कष्टाळूपणा व मेहनत या गुणांची खाण म्हणजे जपान.

हिरोशिमा नागासाकीवर केलेल्या जीवघेण्या अणुबॉम्ब हल्ल्यानंतरही जपान आशियातील आर्थिक महासत्ता बनला याचे गमक त्यांच्या सांस्कृतिक मूल्यांमध्ये आहे. म्हणून तर विवेकानंद म्हणाले होते –

"In my opinion, if all our rich and educated men once go and see Japan, their eyes will be opened".

**– डॉ. प्रशांत धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी – ९४२२४९५०९४

●●●

जगा इतकं की आयुष्य कमी पडेल, हसा इतके की आनंद कमी पडेल, काही मिळाले तर नशिबाचा खेळ आहे, पण प्रयत्न इतके करा की परमेश्वराला देणे भागच पडेल!

# वेळणेश्वर अभ्यासदौऱ्याच्या निमित्ताने

*जोशी-बेडेकर महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा अभ्यासदौरा वेळणेश्वर येथे आयोजित केला होता. या अभ्यासदौऱ्याची माहिती या लेखात देण्यात आली आहे - संपादक*

जानेवारी २०२० नववर्षाची पर्वणी जोशी-बेडेकर महाविद्यालयातील आम्हा शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुभवायला मिळाली. त्याचे निमित्तही होते खास. विद्या प्रसारक मंडळरुपी वटवृक्षाच्या वेळणेश्वर येथील निसर्गाच्या कुशीत वसलेल्या महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय शाखेला भेट देण्याची संधी आम्हाला मिळाली.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आदरणीय डॉ. विजय बेडेकर यांच्या कल्पनाविष्कारातून निर्माण झालेल्या अद्ययावत अत्यंत सुसज्ज अशा महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाची ख्याती सर्वदूर पसरल्यामुळे कोकणातील या परशुराम भूमीला भेट देण्याची सुप्त इच्छा आम्हा सर्वांच्या मनात होती.

डॉ. विजय बेडेकर सर व प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली ह्या अभ्यासपूर्ण दौऱ्याची आखणी केली गेली आणि ठरल्याप्रमाणे जानेवारीच्या १७ तारखेला आमच्या चमूने निश्चित स्थळी मार्गक्रमण केले. नयनरम्य प्रवासासाठी सदैव मागणी असणाऱ्या कोकण रेल्वेच्या तेजस एक्सप्रेसने प्रवास करताना निसर्गाच्या अद्‌भुत आविष्काराची लयलूट करत चिपळूण स्थानकात केव्हा पोहोचलो ते उमगलेच नाही. तेथे ३ टेम्पो ट्रॅव्हलरची व्यवस्था केली होती. डॉ. बेडेकर सर, ऋषिकेश आणि आम्ही सर्वजण ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे स्थानकातून रवाना झालो.

आम्ही सर्वात प्रथम आनंदीबाई पेशव्यांच्या श्रीनगर तळी येथील घरास भेट दिली. पेशवे घराण्यातील रघुनाथराव ऊर्फ राघोबादादांची बायको आणि दुसऱ्या बाजीरावाची आई अशी ही आनंदीबाई. अनेक कथाकार, कादंबरीकार, नाटककार ह्यांच्या लिखाणात कारस्थानी स्त्री म्हणून जिचा उल्लेख सापडतो तीच 'ध चा मा' करणारी आनंदीबाई. सध्याच्या काळात जरी ह्या ठिकाणी भग्नावशेष दिसत असले तरीही ही जागा पेशवेकालीन इतिहासातील अनेक प्रसंगांची आठवण करून देते.

ह्यानंतर आम्ही भारतामधील ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध कायदेशीर राजकारणाच्या मार्गाने स्वातंत्र्यलढ्याचा पाया रचणाऱ्या, मवाळ मतवादी गटाचे अग्रणी नेते म्हणून ओळख असणाऱ्या नामदार गोपाळ कृष्ण गोखले ह्यांच्या निवासस्थानाला भेट दिली. रत्नागिरी जिल्ह्यातील कोतळूक खेड्यातील त्यांचे निवासस्थान म्हणजे त्यांच्या नैतिकता, तत्त्वनिष्ठता, सौजन्यशीलता आणि निःस्थार्थी सेवावृत्ती अशा विविध गुणांची रुजवण घालणाऱ्या एखाद्या पवित्र वास्तूप्रमाणेच आहे. यानंतर आम्ही सर्वजण परशुरामला निघालो.

कोकणभूमी ही परशुरामांनी निर्माण केलेली भूमी आहे आणि म्हणूनच हिरवीगार वनराई, अथांग सागर आणि सह्याद्रीच्या शिखरांचे सान्निध्य असलेल्या ह्या भूमीला देवभूमी असे का म्हणतात याची साक्ष पटते. श्रीक्षेत्र परशुराम हे शेकडो वर्षांचा इतिहास लाभलेले महेंद्र पर्वतावरील तीर्थक्षेत्र इ.स.५७० मध्ये बांधण्यात आले. मुंबई गोवा महामार्ग क्रमांक १७ वर मुंबईकडून गोव्याकडे जात असताना चिपळूणच्या आधी सुमारे ८ कि.मी. अंतरावर डाव्या फाट्याला हे मंदिर उभारलेले

आहे. पुढे परशुरामाचे व मागे त्यांच्या आईचे–रेणुकादेवीचे मंदिर आहे. कोकणच्या या भूमीस 'अपरांत' असेही म्हटले जाते. परशुराम मंदिराचे एक वैशिष्ट्य नमूद करावेसे वाटते की, येथे कोठेही इतर तीर्थक्षेत्रांना जसा बजबजपुरीचा आणि भौतिक आध्यात्मिकतेचा देखावा पहावयास मिळतो तसा अनुभव येत नाही. परशुरामाचे दर्शन घेईतो दुपार झाली. आम्ही सर्वांनी महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाकडे प्रयाण केले.

महाविद्यालयात आम्हा सर्व अभ्यागतांची निवासव्यवस्था अत्यंत उत्कृष्ट होती. कॉलेजच्या मेसमधील सात्त्विक भोजनाचा आस्वाद आणि थोडीशी वामकुक्षी घेऊन डॉ. बेडेकर सरांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही हेदवीच्या गणपतीचे दर्शन घ्यायला निघालो.

सुंदर समुद्रकिनारा लाभलेल्या वेळणेश्वरपासून दक्षिणेस १० कि.मी. अंतरावर हेदवी येथील पेशवेकालीन हे गणेश मंदिर फार प्रसिद्ध आहे. मंदिराचा परिसर अतिशय प्रसन्न असून वरपर्यंत जाण्यासाठी पायऱ्या आहेत. रंगीत तटबंदी, आजूबाजूची आमराई व वेगवेगळ्या रंगीत फुलांनी सजलेल्या बागेच्या पार्श्वभूमीवर उठून दिसणारे हेदवी गणेशाचे दगडी मंदिर पेशवेकालीन स्थापत्यशास्त्राची अनुभूती देते. श्रीदशभुजा लक्ष्मीगणेश नावाने प्रचलित असलेल्या ह्या गणेशाचे दर्शन घेऊन आम्ही वेळणेश्वरला रवाना झालो.

वेळणेश्वर ह्या समुद्रकाठी वसलेल्या गावाला नयनरम्य सृष्टीचा वरदहस्त लाभलेला आहे. वेळणेश्वर हे गुहागरपासून साधारणपणे २२ कि.मी. अंतरावर आणि सुमारे १२०० वर्षांचा इतिहास सांगणारे गाव आहे. विस्तीर्ण समुद्रकिनारा, नारळी पोफळीच्या बागा, स्वच्छ पाणी, सुरक्षिततेच्या दृष्टीने परिपूर्ण आणि सदैव लाटांच्या गाजेची साथ हीच वेळणेश्वरच्या दर्याची खासियत आहे. येथील कातळ शिल्पाचे दर्शनही खूपच प्रभावित करणारे होते. समुद्राच्या साक्षीने क्षणाक्षणाने आणि कणाकणाने क्षितिजापलीकडे जाणाऱ्या सूर्याचे म्हणजेच सूर्यास्ताचे दर्शन आम्ही नजरेत सामावून घेतले. समुद्राच्या उसळणाऱ्या लाटांमध्ये आम्ही मनसोक्त बागडलो. समुद्रकिनाऱ्याजवळच असलेल्या वेळणेश्वर मंदिरात दर्शन घेऊन 'राजा सारंगा, माझ्या सारंगा' अशा ओळी गुणगुणत आम्ही परशुराम अभियांत्रिक महाविद्यालयात परतलो. भोजन आटोपल्यावर डॉ. बेडेकर सरांच्या उपस्थितीत आमच्यापैकी अनेक जणांनी आपला कलाविष्कार सादर केला. अनौपचारिक असा हा छोटेखानी सांस्कृतिक कार्यक्रम 'वो शाम कुछ अजीब थी' म्हणत म्हणत संस्मरणीय झाला.



दुसऱ्या दिवशी १८ जानेवारीला फक्कड कांदेपोह्यांची चव जीभेवर रेंगाळवत आमचा चमू परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाला भेट द्यायला निघाला. ३५ एकरवर पसरलेल्या असा हा विशाल प्रकल्प अनेक आधुनिक तंत्रप्रणालींचा मिलाफ आहे. अभियांत्रिकीचे विविध विभाग, ग्रंथालय, प्रयोगशाळा सौरऊर्जा प्रकल्प, अद्ययावत ऑडिटोरिअम अशा विविध सुविधांनी सज्ज असलेल्या या महाविद्यालयाबद्दल आम्हाला डॉ. बेडेकर सरांनी माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमितकुमार माने यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथपाल चतुर्भुज सर यांनी प्रेझेंटेशन द्वारे विविध पैलूंचे दर्शन घडवले. ह्या भेटीदरम्यान जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक मॅडम यांनी 'ऋत' हे जोशी बेडेकर महाविद्यालयाचे वार्षिक बातमीपत्रक डॉ. अमितकुमार मानेयांना भेट दिले. वि.प्र.मं.च्या ह्या उत्कृष्ट अभियांत्रिकी

(पृष्ठ क्र.२६ वर)

कोणाच्याही सावलीखाली उभा राहिल्यावर स्वतःची सावली कधीच निर्माण होत नाही.
स्वतःची सावली निर्माण करण्यासाठी स्वतः उन्हात उभे रहावे लागते!

# प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था

(भाग–९)

*श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांचेतर्फे मार्च २०१७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था' हा श्री. मधुकर गजानन दातार यांचा लघुशोध निबंध 'दिशा' च्या वाचकांसाठी प्रकाशित करत आहोत – संपादक*

**अध्याय १० वा**

**'पुरनिवेशः' नगरांची रचना आणि नियोजन**

''पुरस्य त्रिविधस्यापि प्रमाणमथ कथ्यते ।
प्राकारपरिखाट्टाळ द्वार–रथ्याध्वभिः सह ।।१।।''

आता तीन प्रकारांच्या नगरांच्या रचना, त्यांच्या भोवतालची तटबंदी, प्रवेशद्वारे, (तटबंदीच्या सर्व बाजूंनी) खंदक (संरक्षणाच्या हेतूने) रस्ते आणि उपरस्ते यांच्या नियोजनाबद्दलची माहिती देण्यात येत आहे.

''ज्येष्ठं तत्र चतुष्चापसहस्रं पुरभिष्यते ।
मध्यं द्वाभ्यां सहस्राभ्यां एकेन व्यासतोऽधमम् ।।२।।''

सर्वात मोठ्या नगराची लांबी ४००० 'धनू' एवढी असावी. मध्यम प्रतीच्या नगराची २००० धनू आणि त्यापेक्षा कमी महत्त्वाच्या नगराची लांबी एक हजार धनू असावी–

''साष्टमांशं सपादं वा सार्धं वा व्यासमायतम् ।
कुर्यादिकैकमायामं चतुरश्रीकृतं शुभम् ।।३।।''

वर उल्लेख केलेल्या नगरांची त्यांच्या लांबीच्या १/८ भागाने, १/४ भागाने (सवा पट) किंवा १/२ भागाने (दीडपट) वाढवायची झाल्यास ती लंबचतुष्कोनी या आकाराची असावी. अशी रचना शुभप्रद मानली जाते.

''चतुरष्टिपदाख्येन पुरं सर्वं प्रकल्पयेत्।
दिरष्टकोष्ठं तत् कुर्यात्षट्पथं नवचत्वरम् ।।४।।''

अशा नगरांची रचना ६४ लंबचतुष्कोन भागांत करावी. त्यांच्यात सोळा विभाग असावेत, सहा रस्ते असावेत आणि नऊ चौकोनी (square) आकाराचे पण विभाग असावेत.

''वंशषड्विभक्तेऽस्मिन् पदषोडशकान्विते ।
राजमार्गाः शुभः कार्यो मध्यमं वंशमाश्रितः ।।''

अशा नगरांत सहा विभाग आणि त्याच्या मध्यभागांत सोळा उपविभाग असावेत. राजमार्ग (सदैव) सर्वांच्या कल्याणाच्या हेतूने करावा आणि त्याचा मध्यभाग हा महत्त्वाचा ठरेल असा करावा.

''कार्यो ज्यायसि (च) ज्यायांश्च चतुर्विंशतिकः करैः ।
विंशत्या मध्यमे मध्योऽधमे षोडशकोऽधमः।।७।।''

मोठ्या नगरात रस्त्याची रुंदी २४ हात असावी. मध्यम प्रतीच्या नगरांत ती वीस हात ठेवावी तर त्याहून कमी महत्त्वाच्या नगरांत सोळा हात असावी.

''बलस्य चतुरंङ्गस्य पौराणां पार्थिवस्य च
असंबाधसमश्चैव कार्योज्यं चाश्मशर्करः ।।८।।''

चतुरंग सैन्यदलाच्या (हस्तीदल, अश्वदल, रथसेवा आणि पायदल) हालचालीसाठी, नागरिक आणि राजेलोकांच्या जाण्यायेण्यासाठीचे रस्ते कोणताही अडथळा नसलेले असे करावेत आणि ते चुनखडी–दगड–गोटे यांच्या मिश्रणाने मजबूत करावेत.

''महारथ्या द्वयं कार्यं तदुपान्तस्थवंशयोः ।
तद् द्वादश दशाष्टौ स्यात् करान् ज्येष्ठादिकं त्रिषु ।।९।।''

दोन मुख्य मार्ग योजावेत आणि त्यांना दोन उपरस्ते

असावेत. त्यांची रुंदी महत्त्वाच्या नगरासाठी १२ हात, मध्यम नगरासाठी १० हात आणि सर्वसामान्यांसाठी कमी महत्त्वाच्या नगरातील रस्त्यांची रुंदी आठ हात असावी.

''पदमध्यगतं मार्गं यानमार्गचतुष्टयम् ।
ज्येष्ठादिषु पुरेष्वेषु तत्पथं च चतुःकरम् ।।१०।।''

दोन उपरस्त्यांच्या मध्ये असलेल्या महामार्गाची योजना, त्या रस्त्यावरून चार विभागण्या कराव्यात. (दोन जाणारे रस्ते त्यांतील एक रथदळ, अश्वदळ यासाठी, तर एक नागरिकांच्या जाण्यासाठी, तशीच योजना परतीच्या रस्त्यावर करावी) मोठ्या नगरांत अशा रस्त्यांची रुंदी चार हात असावी.

''उपरथ्या महामार्गस्यार्धं वा द्विशयाभिकम् ।
शेषा रथ्यास्तदर्धेन विधातव्याः प्रमाणतः ।।११।।''

कमी महत्त्वाच्या रस्त्यांची रुंदी मुख्य रस्त्याच्या रुंदीच्या निम्मी किंवा त्यापेक्षा एक दोन हात अधिक असावी. इतर कमी महत्त्वाच्या रस्त्यांची रुंदी नगराच्या आवश्यकतेनुसार कमी-अधिक केल्यास चालेल.

''यानमार्गचतुष्कस्य कार्यौ पार्श्वदयास्थितौ ।
पदाष्टकपदान्तस्यौ द्वौ द्वा जङ्घापथावपि ।।१२।।''

चारपदरी, चार वाहने जातील अशा रस्त्याच्या दोन्ही बाजूस पदपथ आठ पाद रुंदीचे योजावेत. दोन रस्ते जलदवाहतुकीसाठी पण योजावेत.

''पुरे ज्येष्ठे त्रिहस्तौ तौ मध्यमेऽर्धकरोज्झितौः ।
मध्यमादर्धहस्तेन हीनौ स्यातां कनीयसी ।।१३।।''

मोठ्या नगरांतील पदपथांची रुंदी तीन हस्त असावी. मध्यम महत्त्वाच्या नगरांतील पदपथांची रुंदी २ १/२ हस्त आणि त्यापेक्षा लहान नगरांत पदपथांची रुंदी दोन हात असावी.

''पुरान्तर्गतौ कार्यौ घण्टामार्गौ तथापरौ ।
राजमार्गगुणोपेतौ प्रमाणेन च तद्विथौ ।।१४।।''

मोठ्या नगरांत राजमार्गाप्रमाणे सोयी सुविधा असलेले आणि त्याच म्हणजे राजमार्गाच्याच रुंदीचे दोन रस्ते असावेत.

''प्राक्प्रत्यगायता सप्तदश मार्गा रतीरिताः ।
याम्योत्तरायवास्तद्वद् अन्ये स्युः तत्प्रमाणतः ।।१५।।''

वर वर्णन केल्याप्रमाणे पूर्व-पश्चिम अशा सतरा रस्त्याचे नियोजन सुचवले आहे. हे रस्ते वर उल्लेखिलेल्या संख्येतच आणि तितक्याच रुंदीचे असावेत. तसेच उत्तर दक्षिण दिशेकडे जाणारे रस्ते वरील संख्येत आणि तितक्याच रुंदीचे असावेत.

''घण्टामार्गप्रमाणेन घंटामार्गस्य बाहयताः ।
समन्ततो वप्रभुवं स्थापयेत तद्विधानवत् ।।१६।।''

योग्य त्या जाणकार तज्ज्ञाने रस्त्याच्या सर्व बाजूस आणि शहराच्या पण सर्व बाजूंना तटबंदीची योजना करावी.

आतापर्यंत वाहतुक, रस्तेबांधणी या विषयांतील संस्कृत वाङ्मयातून मिळालेल्या माहितीचा उल्लेख केला आहे. मुख्य विषय जरी 'रस्तेबांधणी आणि वाहतुक' असा असला तरी हा विषय 'नगररचना' या विषयांशी पूर्णतः निगडित आहे. त्यामुळे नगररचना या विषयावरचीही आवश्यक तेवढी माहिती या लघुनिबंधात आतापर्यंत देण्यात आली आहे.

ही सर्व माहिती खालील ग्रंथांतून संकलित करण्यात आली आहे.

१)'अपराजितपृच्छा' २)'कामिकागम' किंवा 'स्थापत्यवेद' ३)'कौटिलीय अर्थशास्त्र' ४)'मानसार' ५)'मयमतम्' आणि ६)'समरांङ्णसूत्रधार'

---

मानवाचा दानव होणे ही त्याची हार, मानवाचा महामानव होणे हा त्याचा चमत्कार,
आणि मानवाचा 'माणूस' होणे हे त्याचे यश आहे.

आतापर्यंतच्या या ग्रंथातून दिलेल्या माहितीमधून काही मुद्दे उल्लेख करावेसे वाटले त्यांचा खाली निर्देश करण्यांत येत आहे.

१) प्रत्येक ग्रंथकाराने नगरांची रचना आणि त्यांतील रस्ते वाहतुक या संदर्भात वेगवेगळे निकष सांगितलेले आहेत. उदा. 'अपराजितपृच्छा' या नगराचे २० विविध प्रकारांचे उल्लेख आहेत. त्यांचे क्षेत्रफळही वेगळे आहे.

२) 'कामिकागम', 'मयमतम्', 'मानसार', 'समरांङ्णसूत्रधार' या ग्रंथांतही नगरांची रचना आणि त्यांतील रस्तेबांधणी यांत फरक जाणवण्यासारखा आहे. बहुधा ही मतभिन्नता ज्या प्रदेशांत आणि ज्या काळांत या ग्रंथांची रचना झाली त्या काळास आणि त्या प्रदेशास अनुरूप अशी ही मांडणी करण्यात आली असावी.

३) त्यांतील काही काही नगरांची नांवे अर्थपूर्ण आहेत. उदा. अग्रहार, कुब्जिम, पट्टण, शिबिर, सेनामुख, राजधानी – या नांवावरूनच त्या त्या नगरांचे वैशिष्ट्य ध्यानांत येते.

४) कौटिलीय अर्थशास्त्रांत नगरांच्या नावाला महत्त्व नाही. पण नगरांची रचना करतांना ती कठीण प्रसंगात, समर–युद्ध किंवा दुष्काळ, असाधारण वृष्टी अशा वेळी दोन नगरे जवळ जवळ असली तर ती एकमेकांस मदत करू शकतील असा विचार कौटिल्याने मांडला आहे. शिवाय अशी नगरे त्यांतील सुखसोयी–सुविधांनी परिपूर्ण होण्यासाठी बाहेरून येणाऱ्या मालावर त्याच्या वेगवेगळ्या प्रकारांमुळे आणि आर्थिक दृष्ट्या कमी–अधिक दराच्या मालावर जकात आकारली जावी हे सुचविणारा कौटिल्य हा एकमेव लेखक.

५) 'मानसार' या ग्रंथांत नगरांच्या क्षेत्रफळाच्या आकाराप्रमाणे, तसेच त्यांतील इतर सुखसोयींमुळे राहण्यास आवडली जातील अशा पद्धतीने काही नगरांची नांवे सुचवली आहेत. नावावरूनच त्या नगरांचे वैशिष्ट्य समजून येते. उदा. 'स्वस्तिक', 'भद्रक', 'कार्मुक' 'चतुर्मुख', 'प्रस्तर', 'सर्वतोभद्र' वगैरे वाणी, शेती करणारी जमात आणि सेवेकरी यांचेसाठी वेगवेगळ्या वसाहती असाव्यात असेही सुचवण्यात आले आहे.

'मयमतम्' या ग्रंथात आकारमानाप्रमाणे प्रत्येक नगराची विविधता सांगण्यात आली आहे. दण्डैस्तेषां तु वक्ष्यते मानम्.

'समरांगणसूत्रधार' या ग्रंथात, नगराची तटबंदी, प्रवेशद्वारे, रस्ते, उपरस्ते यावरुन नगरांची प्रतवारी ठरवण्यात आली आहे.

पुरस्य त्रिविध्स्यापि प्रमाणमथ कथ्यते ।<br>
प्राकारपरिखाट्टाल द्वाररथ्याध्वभिः सह ।।

आता रस्त्यांच्या रचनेबद्दलच्या उल्लेखांचा थोडक्यात सारांश पाहू या –

'कामिकागम' या ग्रंथांत नगरांत दोन प्रमुख रस्ते असावेत असे सुचवलें आहे. मध्यभागी असलेल्या मंदिराला वळसा घालणारा रस्ता हा 'नाभिविधी' असे मानला गेला आहे. तर नगराला वळसा घालून जाणाऱ्या रस्त्याला 'राजमार्ग', 'मंगलमार्ग' किंवा 'रथमार्ग' असेही संबोधले आहे. रस्त्यांची रुंदी अकरा दण्डापर्यंत सुचवली आहे; तर कनिष्ठ सेवकांच्या जाण्यायेण्यासाठी (त्यांना संकोच वाटू नये म्हणून) आणि मलनिःस्सारणाच्या नालिकेसाठी अरूंद बोळ वजा रस्ते असावेत असे सुचवले आहे.

चण्डालानां प्रवेशाय निर्गमाय मलस्य च ।<br>
जलस्य निर्गमार्थं तु क्षुद्रमार्गाः प्रशंसिताः ।।

तसेच गावाच्या मध्यभागी असलेल्या मंदिराच्या सर्वही आठही दिशांना 'अश्वत्थ','लिंब', 'पिंपळ' इत्यादी वृक्ष रोपण करून वाढवावेत असेही सुचविले आहे.

कौटिलीय अर्थशास्त्रात तीन रस्ते पूर्व–पश्चिम आणि तीन रस्ते उत्तर–दक्षिण असावेत आणि प्रत्येक

स्वतःची तुलना इतरांबरोबर करू नका, तसे केल्यास तुम्ही स्वतःचा अपमान करता आहात.

रस्त्यांच्या शेवटास एक याप्रमाणे नगरास बारा प्रवेशद्वारे असावीत असे सुचवण्यात आले आहे. या रस्त्यांची रुंदी चार दण्ड सुचवली आहे. दोन लहान रस्ते मानवांसाठी आणि 'क्षुद्र पशु' शेळी, बकऱ्या इत्यादींसाठी असावेत अशीही सूचना त्यांत आहे. कौटिलीय अर्थशास्त्रांत आढळून आलेला आणि दुसऱ्या कोणत्याही ग्रंथांत नसलेला महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सर्व गांवे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावीत यासाठी बाहेरून येणाऱ्या सर्व मालावर - त्याच्या महत्त्वाप्रमाणे म्हणजेच वस्त्रे, चामडे, सुकी मासळी, रेशमी वस्त्रे, मद्य इत्यादींवर त्यांच्या मूळ किंमतींचा १/६ ते १/१० इतकी जकात आकारावी असे सुचवले आहे. ''इन्स्टिट्युशन ऑफ सिव्हिल इंजिनीअर्स'' च्या एका मासिकांतील काहीं महत्त्वाचे उल्लेख या आधी दिले आहेत.

मुख्यतः राजधानीत छोटे रस्ते किंवा लहान गल्ल्या असू नयेत.

न वीथिं न पथां हि राजधान्या प्रकल्पयेत् ।

तसेच रस्त्याची पृष्ठभूमी ही कशी करावी हे फक्त पाच शब्दांत सांगितलें आहे ते असे ''कूर्मपृष्ठा मार्गभूमिः कार्या ग्राम्यैः ससेतुका।''

नगरवासियांनी रस्त्याची पृष्ठभूमी कासवाच्या पाठीसारखी टणक आणि त्याचप्रमाणे त्याच्या पाठीच्या दोन्ही बाजूस अत्यंत हलका उतार असावा या प्रमाणे करावी.

ही सूचना आधुनिक स्थापत्यशास्त्राच्या नियमानुसार आहे. म्हणजे रस्त्याचा पृष्ठभाग कासवाच्या पाठीसारखा टणक आणि त्याचप्रमाणे त्याच्या पाठीच्या दोन्ही बाजूस जसा हलकासा उतार असतो त्याप्रमाणे करावा. याला स्थापत्यशास्त्रांत camber असे म्हटले जाते. तसेच दुसरी महत्त्वाची सूचना -

''मार्गान्सुधाशर्करैर्घटितान्प्रतिवत्सरम्।''

(सर्व) रस्ते प्रतिवर्षी चुनखडी आणि दगड-गोटे यांच्या मिश्रणाने मजबूत (दणकट) करावेत अशी पण सूचना आहे.

'मानसार' या ग्रंथांत त्यांनी वर्णन केलेल्या आठ प्रकारच्या नगरांतील रस्त्यांची रुंदी नगराच्या महत्त्वाप्रमाणे वेगवेगळी दाखवली आहे. ही नगरे आहेत 'दण्डक', 'सर्वतोभद्र', 'नन्धावर्त', 'पद्मक', 'स्वस्तिक', 'प्रस्तर' 'कार्मुक' आणि 'चतर्मुख'.

याही ग्रंथांत रस्ते चुनखडी-दगड-गोटे यांच्या मिश्रणाने दणकट करावेत अशी सूचना आहे. 'महामार्ग तु सर्वेषां वीथीनां कर्करीकृतम्'

'मयमतम्' या ग्रंथातील नगरे आणि त्यांतील रस्ते यांच्या सूचना पाहू या. रस्त्याला मध्यभागी असलेल्या मंदिराला वळसा घालणारा रस्ता मंगलवीथी या नांवाने संबोधला जावा. रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या पीठाला अथवा मंदिराला जाणारा रस्ता 'ब्रह्मवीथी' या नांवाने ओळखला जावा. रस्त्यांची संख्या ही या ग्रंथात थोडीशी काव्यमय पद्धतीने दिली आहे. ती नावीन्यपूर्ण वाटेल अशी आहे. उदा. वेद = चार, शर = पाच, नन्द = नऊ, पंक्ती = दहा, रूद्र = अकरा, नाटक = दहा (दशावतार), भानू = बारा (सूर्याची बारा नावे), तिथी = पंधरा, (प्रतिपदा ते पौर्णिमा पंधरा दिवस).

'समरांगणसूत्रधार' या ग्रंथाची रचना ही रस्त्याचे सामरीक महत्त्व आणि तेथील नागरिकांची सुरक्षा या गोष्टी ध्यानांत ठेवून केली गेली आहे.

बलस्य चतुरंगस्य पौराणां पार्थिवस्य च
असंबाधसमश्चैव कार्योऽयं चाश्मशर्करः ।।

चतुरंग सैन्याच्या हालचालीसाठी, पौरजनांच्या सुखद प्रवासासाठी, राजपरिवाराच्या जाण्या-येण्यासाठी, कोणतेही अडथळे नसलेले रस्ते करावेत आणि ते चुनखडी-दगड-गोटे यांच्या मिश्रणाने पक्के करावेत.

---

चांगला गुरू यशाचे दरवाजे उघडून देऊ शकतो, पण त्यातून यशाच्या दिशेने जाण्यासाठी स्वतःलाच चालावे लागते!

**'उपसंहार'**

आतापर्यंत वेगवेगळ्या ग्रंथांतील दिलेल्या माहितीपूर्ण विवेचनांतून कांही महत्वाचे निष्कर्ष काढता येतील ते असे.

१) 'अपराजितपृच्छा', 'मयमतम्','कौटिलीय अर्थशास्त्र', 'मानसार', 'समरांगणसूत्रधार' या ग्रंथांतून नगरांच्या रचना आणि त्यांतील रस्ते यांच्याबद्दलच्या विवेचनांत प्रत्येक ग्रंथामागे थोडा थोडा फरक जाणवतो. हा फरक प्रामुख्याने ज्या वेगवेगळ्या काळांत आणि प्रदेशांत या ग्रंथाचे लेखक राहून रचना करत होते, त्यांच्या स्थलवैशिष्ट्यांमुळे आणि कालवैशिष्ट्यांमुळे हे फरक असावेत असा निष्कर्ष काढता येईल.

२) सर्वच ग्रंथकारांनी नगरांची रचना आणि त्यांतील रस्त्यांची योजना ही सर्वसाधारण स्थापत्यकर्त्यांना विनासायास करता येईल अशी दृष्टी समोर ठेवून या सूचना शक्य कोटीतील ठराव्यात अशा पद्धतीने केल्या आहेत.

३) रस्त्यांची रचना आणि पृष्ठभूमी याबद्दलच्या सूचना आधुनिक स्थापत्यशास्त्रातल्या नियमाप्रमाणे आहेत.

''कूर्मपृष्ठा मार्गभूमिः कार्या ग्राम्यैः ससेतुका''

नागरिकांनी रस्त्यांचा पृष्ठभाग कासवाच्या पाठीसारखा दणकट आणि त्याच्या पाठीच्या दोन्ही बाजूस जसा हलका उतार असतो त्याप्रमाणे करावा.

४) ''महामार्गं तु सर्वेषां वीथीनां कर्करीकृतम् ।''

महामार्गं आणि मध्यममार्ग चुनखडी-दगड-गोटे यांच्या मिश्राणाने पक्के करावेत.

पक्षयुक्ता तु वीथिः स्थात्पक्षहीनं तु मार्गकम् ।

महामार्गाला पादचारी पथ असावेत. लहान रस्त्यांना पदपथ असू नयेत.

मार्गच्छेदं नेष्टं पदमध्ये चत्वरं न स्यात्
शेषं युक्त्यानुयुक्तं सम्यग्योज्यं नृपच्छया तज्ज्ञैः ।

रस्त्याच्या मध्यभागांत अडथळा येईल असे बांधकाम, व्यासपीठ किंवा चबुतरा करू नये. पण करायचेच झाल्यास तज्ज्ञ व्यक्तींनी राजास त्याप्रमाणे सल्ला द्यावा.

कौटिलीय अर्थशास्त्रांत पर्जन्यमापक म्हणून एक पात्र चोवीस अंगुळे रूंदीचे मुख्य भांडारगृहासमोर ठेवावे - अशी अत्यंत महत्त्वाची सूचना आहे.

एका लेखांत खालील सूचना आहे. ती महत्त्वाची आहे.

राजमार्गगृहाणि स्युर्गृहाणि सकलान्यपि ।
गृहपृष्ठे दासवीथिं मलनिर्हरणस्थलम् ।।

राजमार्गावरच्या सर्व सदनांची प्रवेशद्वारे राजमार्गावरच दिसतील अशी उभय बाजूंनी केली जावीत पण घराची मागची बाजू ही कनिष्ठ सेवकांच्या जाण्या-येण्यासाठी आणि मलविसर्जन नलिकेच्यासाठी राखीव ठेवावी.

ग्रामद्वयान्तरे चैव पान्थशालां प्रकल्पयेत् ।

दोन गावांच्या मध्ये एका विश्रामगृहाची योजना करावी. वरील पैकी एक सूचना 'कामिकागम' या ग्रंथात पण केली गेली आहे.

चण्डालानां प्रवेशाय निर्गमाय मलस्प च ।
जलस्य निर्गमार्थं तु क्षुद्रमार्गः प्रशंसिताः ।।

कनिष्ठ सेवक, मलनिस्सारणाची नालिका आणि पाणी पुरवठ्यासाठीची नालिका यांसाठी कमी रुंदीचे मार्गांची योजना करावी.

आता काही विसंगती जाणवल्या त्यांचा उल्लेख करीत आहे.

'अपराजितपृच्छा' या ग्रंथातील ३८ व्या सूत्रांत

---

विश्वास हा खोडरबर सारखा असतो. तुम्ही केलेल्या प्रत्येक चुकीबरोबर तो कमी होत जातो!

'भारतक्षेत्रग्रामसंख्याप्रमाणम्' यात भारत देश व त्यांतील गांवे यांची संख्या दिली आहे.

''कान्यकुब्जे ग्रामसंख्या षट्त्रिंलक्षणावि च ।''

'कान्यकुब्ज' किंवा कनौज प्रांतातील नगरांची संख्या त्रेसष्ट लाख आहे. हे विधान तितकेसे विश्वसनीय वाटत नाही.

३७ व्या सूत्रांत प्रत्येक गांवाचे वैशिष्ट्य काय आहे ते सांगितले गेले आहे.

''वृध्दिदं पाश्वदण्डं च श्रीपादं श्रीपुरं तथा ।
रिपुमर्दन रिप्वन्तं स्नाह चैवाभयप्रदम् ।
महाजयं पुरं नाम सर्वदानन्दकारकम् ।'

या श्लोकांत कांही विशिष्ट नगरांतच कांही चांगल्या गोष्टी आहेत याचा उल्लेख आहे.

पर्श्वदण्ड नगरांत रहाणाऱ्याची (सर्व बाजूंनी) भरभराट होते.त्याचप्रमाणे 'श्रीपाद' आणि 'श्रीपुर' नगरांत रहाणाऱ्यांची पण भरभराट होते. 'रिपुमर्दन' गावांत रहाणाऱ्यांच्या शत्रूंचा विनाश होतो. 'स्नाह' नगरांत रहाणाऱ्या लोकांना (सर्व अनिष्ट गोष्टींपासून) पूर्णतः अभय मिळते आणि 'महाजय' नगरांत रहाणारे सर्व नागरिक कायम आनंदीच असतात. हे वर्णनही वास्तवाला धरून आहे असे वाटत नाही.

या सर्व विसंगती दुर्लक्ष करता येतील अशा आहेत. मुख्यतः सर्वच ग्रंथकारांनी 'अपराजितपृच्छा' 'कामिकागम', 'मयमतम्', 'मानसारम्', 'कौटिलीय अर्थशास्त्र','समरांगणसूत्रधार' यांनी त्या त्या काळाच्या आणि त्या त्या प्रदेशाच्या मर्यादेत राहून 'नगररचना आणि वाहतुक व्यवस्था' यावर शक्य तितके वस्तुनिष्ठ विवेचन केले आहे. ज्या काही थोड्या विसंगती आहेत त्या, ग्रंथरचना काळाचा विचार केल्यास, मर्यादित प्रवाससाधने असूनसुद्धा शक्य तेवढी माहिति देण्याचा प्रयत्न केला आहे.

१२०० व्या शतकापासून १५०० व्या शतकापर्यंत वरील विषयांत काय व्यवस्था होती हाही एक संशोधनाचा विषय ठरावा. तसेच जैन/बौद्ध धर्मातील वाङ्मयात यासंबंधी काही माहिति मिळते का हाही एक संशोधनाचा विषय ठरेल. सध्या एवढेच व्यक्त करावेसे वाटत की, वर उल्लेखिलेल्या ग्रंथांत प्राचीन भारतातील नगररचना आणि वाहतुक व्यवस्था या संदर्भांत शक्य तेवढी माहिती देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यात आला आहे.

संस्कृत वाङ्मयांतून आढळलेली प्राचीन भारतातील नगर रचना आणि रस्ते-वाहतुक व्यवस्था या विषयावरील लघुशोधनिबंधासाठी वाचल्या गेलेल्या ग्रंथांची सूची,

१) 'अपराजितपृच्छ' लेखक-'भुवन देवाचार्य' परिमल पब्लिकेशन्स, नवी दिल्ली

२) 'कामिकागम'

३) 'कौटिलीय अर्थशास्त्र' (संपादन- एन्. एस्. व्यंकटेश, ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिटच्युट, युनिव्हर्सिटी ऑफ मैसूर)

४) 'इन्स्टिट्युशन ऑफ सिव्हील इंजिनीअर्स' च्या एका मासिकातील लेख

५) 'मानसार' लेखक 'राजा मानसार' मालवा. संपादन - प्रसन्नकुमार आचार्य, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी, पेरू, लंडन

६) 'समरांगणसूत्रधार' लेखक - 'राजा भोज' मूळ इंग्रजी रूपांतर सुदर्शनशास्त्री शर्मा, 'परिमल प्रकाशन' नवी दिल्ली

**- मधुकर गजानन दातार**

•••

---

सगळ्यात सुंदर नाते हे दोन डोळ्यांचे असते. ते एकाच वेळी उघडझाप करतात, एकाचवेळी रडतात, एकाचवेळी झोपतात तेही आयुष्यभर एकमेकांना न बघता!

# गोंगलाची फुलं

*'गोंगलाची फुलं' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

गेली अनेक वर्षे त्या झाडाचा शोध घेत होतो. अनेक लोकांना त्याचं वर्णन सांगत होतो. पण असे झाड पाहिल्याचे कुणाला आठवत नव्हते. ही झाडे विदर्भात तथा मध्य प्रदेश व छत्तीसगडच्या भागात विपुल आहेत. परंतु पश्चिम महाराष्ट्र व कोकणात मात्र ही झाडे दिसत नाहीत. हे झाड कसंही करून मिळवायचं असा निश्चयच केला. माझा शोध चालूच होता परंतु कुठेही ठावठिकाणा सापडत नव्हता. सावरीच्याच कुटुंबातील मात्र थोडा वेगळेपणा राखणारे हे झाड आहे मध्यम उंचीचं. याची कोणतीही मिजास नाही. कडेकपारीत, डोंगरात, दगडगोटच्यात कोठेही तग धरून राहण्याची याची हिंमत पाहून अचंबा वाटतो.



त्या दिवशी मुंबईतील कुलाबा बस डेपोजवळ असणाऱ्या बी.पी.टी. गार्डनमध्ये फिरत असताना अचानक ते दिसले. झाड पिवळ्या सोनेरी फुलांनी भरून गेले होते. पाने पूर्ण गळलेली. त्यामुळे झाड ओकंबोकं वाटायचं. पण सुंदर पिवळ्या फुलांनी ही उणीव मुळीच जाणवू दिली नाही. आता बहर थोडा ओसरला होता. ठिकठिकाणी फळे सुकून त्यातील कापूस वाऱ्यावर स्वार होऊन आसमंतात झेपावण्यास अधीर झाला होता. फांद्यांच्या टोकावर पिवळी फुले वाऱ्यासह छान डोलत होती. पाच पिवळ्या गर्द रंगाच्या पाकळ्या, मधोमध दिसणाऱ्या पुंकेसराचा झुपका. साधारण दोन इंच ते अडीच इंच व्यासाच्या आकाराची ही फुले येणाऱ्या जाणाऱ्याचे लक्ष सहज वेधून घेतात. ही आहे 'सोन सावर'. विदर्भात या फुलांना 'गोंगलाची फुलं' म्हणतात.

ही फुले साधारणतः फेब्रुवारी पासून फुलण्यास सुरुवात होते. अगदी एप्रिल शेवटापर्यंत ही फुलत राहतात. याच काळात महाशिवरात्र देखील येते. महादेवाला ही फुले खूप आवडतात असा लोकांत समज आहे. त्यामुळे शिवरात्रीच्या आदल्या दिवशी, तसेच शिवरात्रीच्या दिवशी ही फुले हमखास बाजारात दिसतात. मात्र यात उमललेल्या फुलांऐवजी आता उमलू पाहणाऱ्या कळ्यांचाच भरणा असतो.

या फुलांच्या कळ्या देखील सुंदर दिसतात. लालसर रंगाची पाच आवरणं एकमेकांना आच्छादत

---

नात्याची सुंदरता एकमेकांचे दोष स्वीकारण्यात आहे. कारण एकही दोष नसलेल्या माणसाचा शोध घेत बसलात, तर आयुष्यभर एकटे राहाल!

पिवळसर पाकळ्यांशी छान संवाद साधतात. काचेच्या गोटी एवढ्या कळ्यांच्या तोंडाचा भाग मात्र निमुळता होत टोकदार होतो. अशा टोकदार टपोऱ्या कळ्या देखील झाडाचे सौंदर्य वाढवित असतात. फुल पूर्ण उमलले की आपल्या पिवळ्या सोनेरी रंगाने परिसर व्यापून टाकते. आता राज्य असते फक्त सोन सावरीच्या सुंदर पिवळ्या सोनेरी रंगाचं, बाकी सारे रंग त्यापुढे फिके वाटतात, हा फुलोत्सव अगदी एप्रिल महिन्याच्या शेवटपर्यंत चालूच असतो. मे महिन्यात या झाडावर गोलाकार फळे लटकू लागतात. जसजसे ऊन वाढते तशी फळे सुकून ती तडकतात व त्यातून सुंदर कापूस बाहेर पडतो. हा कापूस वाऱ्याबरोबर उडू लागतो. त्याच कापसाच्या मधोमध असतात गोल गोल बिया. कापूस वाऱ्यावर स्वार झाला की या बियादेखील त्या सोबत निघतात. उडत उडत खूप लांबवर आपली प्रजा पोहचविण्यासाठी डोंगर-दऱ्यांचा आधार घेतात. सर्व बिया डोंगराकडे सोपवितात. या बिया डोंगर उतारावर छान वाढतात. आणि योग्य वेळी आपल्या सोनेरी पताका फडकविण्यास सिद्ध होतात. असा हा सुंदर वृक्ष घरोघरी व प्रत्येक सोसायटीत प्रत्येक रस्त्यावर लावल्यास काय बहार येईल! हल्ली दाट पाकळ्या असलेल्या फुलांची झाडे काही ठिकाणी उपलब्ध आहेत.

सोन सावरीची 'गोंगलाची फुलं' याचे इंग्रजी नाव Yellow silk cotton असे असून, शास्त्रीय नाव Cochlospermum Regium असे आहे.

**- प्रकाश दुधाळकर**
एफ-२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर-नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई - ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२
भ्रमणध्वनी - ९८६९५४१९६६

•••

(पृष्ठ क्र. १८ वरून - **वेळणेश्वर अभ्यासदौऱ्याच्या निमित्ताने**)



महाविद्यालयाच्या भेटीनंतर आमच्या संस्थेचे कार्य, तळमळ आणि आधुनिकतेचा वस ह्या तत्त्वांचा अभिमान वाटला. यानंतर आम्ही सर्वजण गुहागरला निघालो. तेथे आम्ही व्याडेश्वर मंदिर आणि दुर्गादेवी मंदिराला भेट दिली. आमच्यापैकी अनेक जणांना कोकणच्या मेव्याची लज्जत चाखायची असल्याने आम्ही नजीकच्या बाजारपेठेत गेलो. काजू, कोकम, आंबावडी, फणसपोळी इ. वस्तू घेऊन आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो.



मुंबईला येताना तेजस एक्सप्रेसच्या जलद प्रवासासंगे दोन दिवसांच्या या सुखद अभ्यासदौऱ्याच्या गंमतीजमती आठवत ठाण्याला पोहोचलो. परशुरामाच्या ह्या कोकणभूमीस आणि तेथे दिमाखदारपणे कार्यरत असलेल्या वि. प्र. मं.च्या महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयास पुन्हा भेट देण्याचा असाच योग येत रहावो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!!

**- सहा. प्राध्यापक डॉ. अर्चना प्रभुदेसाई**
वाणिज्य विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८१९६२५५२१

अडचणीत असतांना अडचणीपासून दूर पळणे म्हणजे अजून मोठ्या अडचणीत जाण्यासारखेच आहे!

# .... आणि तो कोसळला

*सोमवार, ९ मार्च २०२० रोजी आपल्या मुंबई शेअरबाजाराचा ३० समभागांच्या बाजारभावावर आधारित असा निर्देशांक (BSE सेन्सिटिव इंडेक्स किंवा सेन्सेक्स) १९४२ अंशांनी खाली आला. अगदी कोसळलाच. प्रस्तुत लेखात याचा आढावा घेतला आहे चंद्रशेखर टिळक यांनी – संपादक*

सोमवार, ९ मार्च २०२० रोजी आपल्या मुंबई शेअरबाजाराचा ३० समभागांच्या बाजारभावावर आधारित असा निर्देशांक (BSE सेन्सिटीव इंडेक्स किंवा सेन्सेक्स) १९४२ अंशांनी खाली आला. अगदी कोसळलाच.

गेल्या महिनाभरात हा निर्देशांक तब्बल ५००० अंशांनी खाली आला आहे. त्यामुळे किती गुंतवणूकदारांचे किती नुकसान झाले आहे आणि एकंदरीतच शेअरबाजार म्हणून किती लाखो कोटी रुपयांनी शेअरबाजाराचे बाजारी भांडवली मूल्य (मार्केट कॅपिटलायझेशन) कमी झाले आहे आणि त्यामुळे हे कसे आणि किती आर्थिक पानिपत आहे याची चर्चा आता जोरदार सुरू होईल.

खरं म्हणजे ती झालीच आहे.

आणि ते साहजिकच आहे.

बाजार आणि आपण सगळे यांत हे एक मोठे साम्य आहे .... आपण दोघंही बोलतो जास्त आणि प्रत्यक्षात कृती कमी करतो ....

'प्रत्यक्षातले पानिपत होण्यातसुद्धा खरंच लढणारे कमी आणि बघे मंडळी जास्त असं होते' असं सांगणारे अनेक इतिहासकार आहेतच की !

आताची आपल्या शेअरबाजाराची स्थिती आणि त्यावेळच्या पानिपतची स्थिती अशी एकत्रित परिस्थिती जर डोळ्यांसमोर आणली तर अशावेळी 'बाजार बुणगे' या शब्दाचा वेगळाच अर्थ मनामधे डोकावायला लागतो.

आणि मग असं वाटायला लागते की, आमच्या वरसईचे वरसईकर गोडसे भटजी यांनी जसं त्या पानिपत लढाईच्या पार्श्वभूमीवर 'माझा प्रवास' हे पुस्तक लिहिले तसं या पानिपताचा प्रवास बघितला तर ...

भले !

ते पुस्तक जसं अजरामर झाले, तसं हे लेखन होणार नाही.

पण निदान किती रत्ने भंगली, किती बांगड्या फुटल्या हे जरी .....

एकदा असं पाहायला लागले ना की लक्षात येते ....

तसं १ फेब्रुवारी २०२० रोजी या वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर झाल्यापासूनच शेअरबाजार गंमतजंमत करत होता. त्यावेळी त्याकडे फारसे गांभीर्याने पाहाण्याची आवश्यकता नव्हती असे वाटणे साहजिक होते. आपल्या देशाची त्यावेळी आर्थिक पार्श्वभूमी सक्षम नसली तरी अगदी दीनवाणीही नव्हती आणि नाही. जगातल्या इतर अनेक देशांच्या तुलनेत आपण एक राष्ट्रीय अर्थव्यवस्था म्हणून तुलनेने बऱ्याच बऱ्या स्थितीत होतो आणि आहोत.

अर्थसंकल्पाच्या दिवशी हा निर्देशांक सुमारे १०००

---

जी व्यक्ती तुमच्या प्रगतीवर जळते त्याचा तिरस्कार कधीच करू नका. कारण ती व्यक्ती स्वतःपेक्षा तुम्हाला उत्कृष्ट व्यक्ती समजून जळत असते.

अंशांनी खाली आला तरी त्यात विशेष काही वाटले नाही. कारण दिवसभरात अशा प्रमाणाच्या चढ – उतारांची आता आपल्याला सवय झाली आहे. आणि मुळातच शेअरबाजाराला कोणत्याही गोष्टीवर ताबडतोब आणि टोकाची प्रतिक्रिया देण्याची सवय असते हे आता आपल्या अनुभवाचे क्षेत्र झाले आहे. आणि तसंही अर्थसंकल्प सादर होण्याच्या दिवशी आपल्या शेअरबाजाराचे सर्वसाधारण निर्देशांक वरच्या पातळीवर बंद होण्याची स्थिती अगदीच हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या वर्षात झाली आहे हेही आता सर्वांनाच माहिती आहे की !

यंदाच्या अर्थसंकल्पात आयकराचे दर, लाभांश – कर आकारणी यांत झालेले बदल या सगळ्यांशी 'आलिया भोगासी, असावे सादर' असं आपण स्वतःलाच पटवत आणि बजावत असताना चीनमधे करोना व्हायरस प्रकटला. तो ज्या वेगाने सर्वव्यापी व्हायला लागला त्या वेगाने आणि त्याच्याहीपेक्षा जास्त प्रमाणात जगभरातील अर्थकारणावर मात करायला लागला हे तर त्या पानिपतच्या लढाईत पेशव्यांच्या सैन्यावर गनिमी मार्गाने केलेल्या चढाईपेक्षा भारी ठरला आहे ....निदान आजमितीस तरी !

आणि त्या आगीत तेल ओतल्यातली गत म्हणून ''यस बँक' 'नो'' म्हणत कोसळल्याची बातमी धडकली आणि मग आत्ताच्या न्यूझीलंडच्या दौऱ्यात भारतीय फलंदाजी काय कोसळली त्याच्या कित्येक जास्त पट गुंतवणूक क्षेत्र कोसळले.

दुःखात सुख शोधायचे झाले तर इतकेच आहे की, केवळ आपल्याच देशात हे घडले आहे किंवा घडत आहे असे नाही तर हे जगभरात सगळीकडेच होत आहे.

आपल्या माजी पंतप्रधान मा. कै. इंदिरा गांधी एकदा म्हणाल्या होत्या की Corruption is Global Phenomenon अशातली गत ....

हे आत्ताच्या घसरगुंडीचे वर्णन नसून विश्लेषण किंवा कारण आहे . सध्याच्या काळात आपल्या देशाचे अर्थकारण जितके स्थानिक आहे; तितकेच किंवा त्याहून जास्त जागतिक होत चालले आहे याचे हे लक्षण आहे. २००८–९ ची मंदी जरी आपण स्थानिक क्षमतेच्या (उत्पादन आणि उपयोग किंवा उपभोग अशा दोन्ही अर्थाने) पेलली असली (केवळ निभावली नाही) तरी आता आपली राष्ट्रीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थकारणाच्या परीघावर उरलेली नसून निदान त्रिज्येच्या जवळपास सरकू लागली आहे ....त्यामुळे संकट आणि संधी अशा दोन्ही अर्थाने हे आता जाणवू लागले आहे.

यावेळी शेअरबाजारात उडालेल्या घसरगुंडीकडे पाहात असताना पटकन जाणवणारी गोष्ट ही आहे की, यावेळी सोने, तेल, शेअरबाजार हे एकाचवेळी एकाच दिशेने ... म्हणजे कोसळण्याच्या दिशेने ... प्रवास करत आहेत. सर्वसाधारणपणे असं होत नाही. त्यांचे उलटसुलट दिशेने प्रवास हे एकमेकांच्या चढ – उताराचे कधी परिणाम असतात आणि कधी कारण.

एरवी तेलाचे भाव चढले की शेअरबाजार कोसळतो.

साधारणपणे सोन्याची मागणी वाढली की शेअरबाजार खाली येतो.

शेअरबाजार तेजीत आला की सर्वसाधारणपणे सोन्याची मागणी कमी होते ...

त्यामुळे ही गणिते चक्राकार (सायक्लीकल अशा अर्थाने) पद्धतीने सुरू असतात असं म्हटले जाते.

सध्या मात्र हे गणित अशा सरधोपट त्रैराशिक पद्धतीने सुरू नाही. असे नसणे हे केवळ वैशिष्ट्यपूर्ण

नसून विपरीत आहे. कारण सध्याची समस्या फार लवकर आणि फार कष्ट न करता सुटणारी नाही हा त्याचा अर्थ आहे.

साधारणतः शेअरबाजारात अशी घसरण झाली की, 'लिया - दिया' वाली मंडळी किंवा डे ट्रेडिंग अडिक्ट्स किंवा सटोडिये ही मंडळी एकदम जोरात येतात . त्यांच्या हालचालींमुळे शेअरबाजार आणखीनच अस्थिर व अविश्वसनीय बनतो, बनत राहतो.

यावेळी मुळातच शेअरबाजार, अगदी जागतिक पातळीवर सुद्धा इतका बिघडला आहे की, अशी सराईत मंडळी सुद्धा बावचळून गेली आहेत. त्यांची जर ही स्थिती असेल तर माझ्या - तुमच्या सारख्या सर्वार्थाने मर्यादीत क्षमतेच्या माणसांनी अशा अल्पकालिन व्यवहारांपासून निदान या काळात तरी बाजूलाच राहिलेले बरे !

कालच मी एकाला गंमतीने म्हणालो की ... असा शेअरबाजार म्हणजे दर दिवशी दरवेळी त्या दिवसाची उलाढाल सुरू झाल्यापासून एकच करायचे ...आणि ते म्हणजे त्यादिवशीचा बाजार कधी बंद होत आहे याची वाट पाहायची!

कारण सध्याचा बाजार हा करोना सारख्या जागतिक प्रादुर्भावाच्या विषाणूने ग्रासला आहे. त्याचा उदगाता चीन सारखी मोठी अर्थव्यवस्था आहे. माल - उत्पादन व वितरण व प्रमाण व सर्वंकष स्वरूप अशा अर्थाने ते खरे आहे. आता त्यावर आलेल्या निर्बंधांमुळे आज जगातील प्रत्येक अर्थव्यवस्था स्वतःच्या अर्थकारणाचे परीक्षण व मूल्यांकन करत आहे. त्यातून कोणत्याही गुंतवणूक निर्णयासाठी वेळ लागणे स्वाभाविक आहे.

अशावेळी शेअर बाजारातल्या उलाढालीचे प्रमाण आणि सातत्य आणि स्वरूप हे सगळेच खालच्या पातळीवर येतात.

आणि उलाढालीचे कमी प्रमाण ही गैरव्यवहार होण्यासाठीची अतिशय सुपीक अशी पार्श्वभूमी असते असा आजपर्यंतचा इतिहास आणि म्हणून अनुभव आहे. अशा बाजारात माझ्या - -तुमच्या सारख्या मर्यादित वकूबाच्या माणसाने व्यवहार, आणि तेही अत्यल्पकालीन करणे म्हणजे धोक्यालाच निमंत्रण ठरेल. कारण त्यातून आपल्या जमेचा इतिहास घडण्यापेक्षा आपण इतिहासजमा होण्याचीच शक्यता जास्त असेल!

''एकादशीच्या घरी शिवरात्र'' असे वाटावे त्याप्रमाणे यावेळी अशा मंदीच्या काळात यस बँक प्रकरणाची भर पडली आहे. ह्या बँकेतल्या घोटाळ्यात त्यातल्या त्यात सुखाची बाब आहे की, पहिल्याच फटक्यात रिझर्व्ह बँकेने यस बँकेच्या कारभारावर कडक बंधने आणली असून लगेचच त्याच्या हस्तांतर-विलीनीकरण प्रक्रियेला सुरवात केली आहे.

त्याशिवाय ''बँकिंग क्षेत्रातील जेट एअरवेज'' असं ज्या यस बँकेचे वर्णन करता येईल त्याच्या खातेदारांना त्यांच्या खात्यातून अगदीच ५-१० हजार रुपये काढण्याची मुभा न मिळता ५०००० रुपये काढण्याची परवानगी देण्यात आली आहे. पंजाब - महाराष्ट्र किंवा त्याआधीच्या प्रकरणांतल्या तुलनेत ही सवलत भरीव आहे.

ही चर्चा करत असताना अजून एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे आणि तो म्हणजे,- हे नुकसान किंवा अडचण फक्त यस बँकच्या ग्राहक - ठेवीदार - भागधारकां (शेअर - होल्डर्स )- पुरता मर्यादित राहणारा नाही. यस बँक संबंधित आपल्या सर्व गुंतवणूका एका विशिष्ट कालावधीत मार्क टू मार्केट पद्धतीने काढून घ्याव्यात अशी सक्ती रिझर्व्ह बँक, सेब, पीएफआरडीए करू शकतात. त्याचा म्युच्युअल फंड योजनांसहीत अनेक साधनांच्या निव्वळ मालमत्ता मूल्या (म्हणजेच

---

जीवनात चांगला माणूस होण्यासाठी एवढंच करा. चुकाल तेव्हा माफी मागा,
अन् कुणी चुकलं तर माफ करा!

नेट असेट व्हल्यू किंवा एनएव्ही) वरही अत्यंत वाईट परिणाम होऊ शकतो; नक्कीच होतो.

'कोणाच्या खांद्यावर, कोणाचे ओझे' असंच आहे हे .... करणारा करून गेला; उरणारा उष्टी - खरकटी .... अशातली गत आहे ही ! ! ! !

अशावेळी गुंतवणूक करताना कोणताही गुंतवणूक विषयक सल्ला हा सार्वत्रिक, सार्वकालीक रामबाण उपाय नसतो; तर तो कालसापेक्ष, उदाहरण - सापेक्ष, व्यक्तिसापेक्ष, स्थितीसापेक्ष असतो याचेही भान ठेवावे लागते.

उदाहरणच द्यायचे झाले तर अनेकदा असा सल्ला दिला जातो की, उतरत्या बाजारात टॉप गेनर्स (ज्यांचे बाजारभाव त्यादिवशी सर्वात जास्त वाढले आहेत असे शेअर्स) चा खरेदी साठी विचार करावा .

सोमवारी (९ मार्च २०२०) निर्देशांक १९४० अंशांनी असा विक्रमी कोसळत असताना त्यादिवशी 'टॉप गेनर्स' यादीत यस बँकचे शेअर्स होते .....

आत्ता शेअरबाजाराची जी स्थिती आहे तशी जेंव्हा स्थिती असते तेंव्हा अनेकजण, अनेकवेळा असा सल्ला देतात की, अशी परिस्थिती ही दीर्घकालीन गुंतवणूक करण्यासाठी एकदम सुवर्णसंधी असते.

हे म्हणणे तत्त्वतः बरोबर आहे.

पण हे सरसकट अंमलात आणता येत नाही.

त्यासाठी निकष-सापेक्षता लागते.

नाहीतर आपल्या गुंतवणुकीचे 'मी पुन्हा येईन' वाल्यांसारखे होते.

ते टाळायचे असेल तर ...

आजच्या परिस्थितीत कंपनीचे क्षेत्र, त्याच्या उत्पादनाचे स्थान, मागणीचे प्रमाण व सातत्य, कच्च्या मालाची उपलब्धता आणि त्याचे मार्ग अशा मुद्यांचा विचार करत असतानाच उत्पन्न आणि नफ्याचे प्रमाण व कर्जाचे प्रमाण याचाही विचार करावा लागेल.

हे सगळे पाहाताना मनोमन हे पटत राहाते की ..

कोणतेही क्षेत्र असो ...

कोणताही काळ असो ...

अरुणा ढेरे त्यांच्या एका कवितेत जे म्हणतात ...तेच खरे.

त्या लिहितात ....

'गे क्षणात बाजूस होती
स्पर्शता तळातून नाती
ओंजळीत धरता मूल्ये
भुरुभुरु गळून ये माती.'

**- चन्द्रशेखर टिळक**
सी -४०२. राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व )
पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६

•••

दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

मन ओळखणाऱ्यांपेक्षा मन जपणारी माणसं हवीत. कारण, ओळख ही क्षणभरासाठी असते तर जपवणूक आयुष्यभरासाठी!

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

### जानेवारी व फेब्रुवारी मधील उपक्रम

मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा तसेच त्यांच्या सर्वसामान्य ज्ञानात वाढ व्हावी यासाठी वर्षभर विविध उपक्रम पूर्व - प्राथमिक विभागात राबविले जातात. जानेवारी - फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या उपक्रमांचा थोडक्यात आढावा.

शैक्षणिक परिसर सहल :- सिनियर के. जी. मध्ये अभ्यासक्रमाचा भाग म्हणून सार्वजनिक ठिकाणं (उदा.:- शाळा, शुश्रुषालय, रेल्वे स्टेशन, इत्यादी) शिकविण्यात येतात. याचाच अनुभव घेण्यासाठी मुलांना एन. के . जी. एस. बी. बँकेत नेण्यात आले व बँकेच्या व्यवहारांची थोडक्यात माहिती दिली. तसेच त्यांनी डॉ. बेडेकर शुश्रुषालयात जाऊन तेथील विविध विभागांची, उपकरणांची थोडक्यात ओळख करून घेतली.

२७ जानेवारी - गोष्ट सांगणे दिवस :- नेहमी शिक्षक मुलांना गोष्टी सांगतात. २७ जानेवारी रोजी नर्सरीच्या मुलांनी त्यांच्या मातृभाषेत तर ज्युनिअर, सिनियरच्या मुलांनी इंग्रजी भाषेत गोष्टी सांगितल्या. मुलांनी उत्तम प्रतिसाद दिला.

१ फेब्रुवारी - मुक्कामपोस्ट शाळा (Overnight Camp):- मुलांना स्वावलंबी करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या अनेक उपक्रमांपैकी एक उपक्रम म्हणजे एक रात्र सिनियर केजीच्या मुलांचा शाळेतील मुक्काम. १ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ७ ते २ फेब्रुवारी सकाळी ७ पर्यंत मुलांनी आपल्या मित्र-मैत्रिणी तसेच शिक्षिकांबरोबर शाळेत मुक्काम केला. संध्याकाळी शाळेच्या पटांगणात मुलांनी नृत्य गाण्यांचे सादरीकरण केले. नंतर मुलांनी पंगतीत बसून पुरी, बटाटा भाजी व श्रीखंड अशा आवडीच्या जिन्नस असलेल्या जेवणावर ताव मारला. नंतर रात्री शेकोटी लावण्यात आली आणि शेकोटी भोवती फेर धरून मुलांनी गाणी गायली. अंदाजे १०:३० वाजता वर्गात जाऊन मुलांनी रात्रीचे कपडे घातले व शिक्षकांच्या मदतीने अंथरुणे घालून मित्रमैत्रिणींच्या बाजूला गप्पा मारत ११ वाजता झोपी गेले. सकाळी ६:३० वाजता मुलं उठली व अंथरुणाची आवराआवर करून सकाळी ७ वाजता पालकांबरोबर घरी गेली. जाताना शाळेतील मुक्कामाची एक अविस्मरणीय आठवण बरोबर घेऊन गेली.

१० फेब्रुवारी- सिनियर केजीच्या मुलांना वक्तृत्व दिनानिमित्त 'माझे आवडते स्थळ' हा विषय देण्यात आला होता. त्यांची आवडती स्थळं गाव, मैदान, बाग इ. होती. एका विद्यार्थ्याने त्याचं आवडतं स्थळ स्वयंपाक घर सांगितलं जे सर्व शिक्षकांना अनपेक्षित होत! वक्तृत्वदिनाला मुलांचा प्रतिसाद उत्तम होता. मुलांसाठी १० फेब्रुवारी रोजी वक्तृत्वदिनाचे आयोजन केले, ज्यासाठी 'माझे आवडते स्थळ' हा विषय देण्यात आला होता.

१३ फेब्रुवारी - वार्षिक कला व विज्ञान प्रदर्शन :- वार्षिक विज्ञान व कला प्रदर्शन १३ फेब्रुवारी रोजी शाळेत भरविण्यात आले होते.

नर्सरीच्या लहान विद्यार्थ्यांनी चित्र व प्रत्यक्ष वस्तू दाखवून पौष्टीक आहाराचे महत्त्व तसेच प्राणी आपल्याला कसे उपयुक्त आहेत हे सर्वांना सांगितले. मुलांनी सूक्ष्म व स्थूल विकासाकरता उपयुक्त असणाऱ्या उपक्रमांची प्रात्यक्षिके दाखविली.

ज्युनिअर, सिनियरच्या मुलांनी इंग्रजी, गणित

---

कासवाच्या गतीने का होईना पण रोज थोडी थोडी प्रगती करा, खूप ससे येतील आडवे.
बस त्यांना हरवायची हिम्मत ठेवा.

आणि परिसर अभ्यासविषयातील काही शैक्षणिक साधनांच्या (teaching aids) सहाय्याने माहिती दिली. उदा.: He, She, It चा वापर, चढता उतरता क्रम, वाहन, फुले, मापन, दूध व दूधापासून होणारे पदार्थ, झाडांचे विविध उपयोग इत्यादी.

नर्सरी, सिनियर केजीच्या विद्यार्थ्यांनी पालकांच्या मदतीने टाकाऊ वस्तूंतून केलेल्या टिकाऊ वस्तू प्रदर्शनात मांडल्या होत्या.

आलेल्या पालकांनी सर्व प्रात्यक्षिकांचे, तसेच विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले.

२४ फेब्रुवारी – सर्व सामान्य ज्ञानावर प्रश्नोत्तरे :– २४ फेब्रुवारी रोजी ज्युनिअर, सिनियरच्या मुलांना त्यांच्या वयानुसार सर्व सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्न विचारण्यात आले. मुलांनी चांगला प्रतिसाद दिला.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**संस्कार भारती ठाणे विभाग आयोजित पथनाट्य स्पर्धेचा निकाल :**

पथनाट्य स्पर्धेमध्ये आपल्या शाळेने सौ. वीणा जोशी लिखित व दिग्दर्शित ''डिजिटल कुटुंब'' पथनाट्याचे सादरीकरण केले. या स्पर्धेत शाळेने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

**दत्तात्रय सत्संग मंडळ ठाणे आयोजित गीता पठण स्पर्धेचा निकाल :**

स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांची यादी :

| इ. | विद्यार्थ्यांची नावे | क्रमांक |
|---|---|---|
| ५ वी | शर्वाणी वैद्य | प्रथम |
| ७ वी | अमृता बापट | तृतीय |
| ७ वी | गायत्री बेडेकर | उत्तेजनार्थ |

**मा. मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांजकडून कु. सेजल सोनावणेचे (इ.८ वी) कौतुक :**



दिनांक ६ फेब्रुवारी, २०२० रोजी हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मारकाच्या लोकार्पण सोहळ्यासाठी चित्रांचे प्रदर्शन भरवले गेले. त्यानिमित्ताने आपल्या शाळेची विद्यार्थिनी कु. सेजल सोनावणे (इ. ८ वी) हिला तिची चित्रे प्रदर्शनात मांडण्याची संधी मिळाली. त्यावेळी मा. मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांजकडून तिला कौतुकाची थापही मिळाली. तसेच याचवर्षी 'इंटरमिजिएट' परीक्षेतही विशेष प्रावीण्य मिळवत ती राज्याच्या गुणवत्ता यादीतही आली आहे. ही बाब शाळेसाठी अत्यंत अभिमानास्पद आहे.

**ब्राह्मण सेवा संघ आयोजित 'सुभाषित रसग्रहण' स्पर्धेचा निकाल:**

१) इशान फणसे – प्रथम क्रमांक
२) श्रेया मोघे – प्रथम क्रमांक
३) गार्गी भागवत – तृतीय क्रमांक

**ब्राह्मण सेवा संघ आयोजित रामरक्षा पठण स्पर्धेचा निकाल :**

वैभवी गोरे – प्रथम क्रमांक

**ब्राह्मण सेवा संघ आयोजित मराठी वक्तृत्व स्पर्धेचा निकाल :**

श्रेया मोघे – प्रथम क्रमांक

जर तुम्हाला तुमची श्रीमंती मोजायची असेल तर नोटा मोजू नका! कधी चुकून डोळ्यांत दोन अश्रू आले तर ते पुसायला किती जण येतात ते मोजा!!

**महाराष्ट्रभाषा आयोजित हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा २०१९ – २०२० चा निकाल :**

| इ. | परीक्षेचे नाव | उपस्थित विद्यार्थी | निकाल | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विशेष प्राविण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
| ५ वी | बालबोधिनी | ०४ | ०३ | – | ०१ | – |
| ६ वी | प्राथमिक | ०८ | ०२ | ०५ | ०१ | – |
| ७ वी | प्रवेशिका | ०५ | ०३ | ०२ | – | – |
| ९ वी | प्रबोध | ०१ | – | – | ०१ | – |

**रामायण परीक्षा २०१९ – २०२० :**

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी – २७

उत्तीर्ण झालेले विद्यार्थी – २७

| विशेष प्रावीण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
|---|---|---|---|
| ६ | १० | २ | ३ |

विशेष प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांची नावे –

| विद्यार्थ्याचे नाव | गुण |
|---|---|
| १) महेक चेदवनकर | ९२/१०० |
| २) देवश्री कुलकर्णी | ८३/१०० |
| ३) अवनी देवधर | ८३/१०० |
| ४) आर्यन निमकर | ८२/१०० |
| ५) मिहीर फडके | ८१/१०० |
| ६) सृजन भोळे | ८०/१०० |

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**डॉ. वा. ना. बेडेकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा संपन्न**




दि २० फेब्रुवारी रोजी, जोशी बेडेकर महाविद्यालयात डॉ. वा. ना. बेडेकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा संपन्न झाली. स्पर्धेचे हे सहावे वर्ष होते. 'नागरिकत्व सुधारणा कायदा : साधक की बाधक' या विषयावर महाराष्ट्रातील १८ वेगवेगळ्या महाविद्यालयांतील संघ स्पर्धेत सहभागी झाले होते. स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी संत एकनाथांच्या 'जनी हेची जनार्दन' या वचनाचा उल्लेख करत आपल्या वक्तृत्वाने जनता जनार्दनाची सेवा करण्याचा सल्ला दिला. स्पर्धेसाठी ज्येष्ठ अभ्यासिका अलका कुलकर्णी व राजकीय विश्लेषक अभय देशपांडे परीक्षक म्हणून लाभले होते.

---

प्रत्येकाशी प्रेमाने वागलं पाहिजे, जे तुमच्याशी वाईट वागतात त्यांच्याशीही प्रेमानेच वागलं पाहिजे; ते चांगले आहेत म्हणून नाही, तर तुम्ही चांगले आहात म्हणून!

ठाण्याच्या सांस्कृतिक अवकाशात मोलाची भर घालणाऱ्या विद्या प्रसारक मंडळाचे अध्वर्यू स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या तपस्वी जीवनाला श्रद्धांजली म्हणून ही राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा जोशी बेडेकर महाविद्यालयाने आयोजित केली होती. स्पर्धेच्या संयोजनात जनसंज्ञापन विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील, डॉ. विमुक्ता राजे, प्रा मानसी जंगम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. स्पर्धेस विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या परिषदेच्या यशस्वीतेसाठी डॉ. महेश पाटील, डॉ. संगीता मोहंती, डॉ. विमुक्ता राजे, डॉ. प्रशांत धर्माधिकारी, प्रा. मानसी जंगम, प्रा. सुदाम अहिरराव, प्रा. तेजल शिंदे यांनी प्रयत्न केले. परिषदेस पत्रकारिता व जन संज्ञापन विभागाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



दि. २२ फेब्रुवारी रोजी ज्येष्ठ अभ्यासिका डॉ. मृदुला बेळे यांचे 'बौद्धिक स्वामित्व हक्क' विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

**देशी वाणाची बियाणे वापरण्यास पुढाकार घेतला पाहिजे: बीजमाता राहीबाई पोपरे**



ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेत दिनांक २५ फेब्रुवारी रोजी स्मार्ट उद्योजक, उद्योगोपयोगी 'सीड मदर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राहीबाई पोपरे यांचे 'पारंपरिक बियाणे व शेतकरी' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

आपला देश कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. या कृषीप्रधान देशात अनेक प्रकारच्या धान्याच्या जाती आहेत. बियाणांची वाण आहेच, परंतु आज देशात हायब्रिड शेती जास्त प्रमाणात वाढलीय. शाश्वत शेती करण्यासाठी जुन्या धान्याची वाणं आज खूप कमी ठिकाणी उपलब्ध आहेत.

पारंपरिक आणि देशी वाणाचं जतन करणाऱ्या राहीबाई पोपरे या 'देशी बियाणांची बँक' चालवतात. शैक्षणिकदृष्ट्या निरक्षर असलेल्या राहीबाई खरंतर ज्ञानाने समृद्ध आहेत. ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांनी एका कार्यक्रमात राहीबाईंचा उल्लेख 'मदर ऑफ सीड' असा केला होता.

अहमदनगर जिल्ह्यात कोंभाळणे हे एक आदिवासी खेडेगाव. राहीबाई मूळच्या याच गावच्या. राहीबाईंच्या वडिलांकडून त्यांना खूप ज्ञान मिळाले, असे त्या सांगतात. वडील नेहमी म्हणायचे, 'जुनं ते सोनं'. त्याचा अर्थ राहीबाईंनी खूप चांगला समजून घेतला. राहीबाईंच्या आजूबाजूच्या परिसरातील आजही ५० टक्के शेतकरी हा पारंपरिक पद्धतीची देशी वाणाचे बियाणे वापरूनच शेती करतो.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी प्रास्ताविकात बहिणाबाईंच्या 'माझी माय सरसोती' या कवितेचा संदर्भ देत राहीबाई पोपरे यांच्या कामाचा आढावा घेतला.

कुणावाचून कुणाचे काहीच अडत नाही हे जरी खरे असले; तरी कोण कधी उपयोगी पडेल हे सांगता येत नाही.

कार्यक्रमाचे संयोजन जनसंज्ञापन विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. विमुक्ता राजे यांनी केले. व्याख्यानास विद्यार्थी, प्राध्यापक व अभ्यागत मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्याख्यान झाल्यानंतर विद्यार्थ्यांसोबत प्रश्नोत्तरांचा तास रंगला.

**मराठी राजभाषा दिवस साजरा**



२७ फेब्रुवारी २०२० रोजी मराठी राजभाषा दिवस साजरा करण्यात आला.

**स्टाफ अकॅडमी तर्फे अर्थसंकल्प २०२०– २१ विषयावर व्याख्यान**




दि. ३ मार्च रोजी सी. ए. राजेश आठवले यांचे स्टाफ अकॅडमी तर्फे अर्थसंकल्प २०२०– २१ विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या वेळी बहुसंख्य प्राध्यापक उपस्थित होते.

**उपप्राचार्या संगीता दीक्षित यांना ठाणे गौरव**



कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या संगीता दीक्षित याना ठाणे गौरव सेवा प्रतिष्ठान आणि समर्थ भारत व्यासपीठ यांच्यातर्फे 'ती' महोत्सवमध्ये शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल पुरस्कार देण्यात आला.

**महिला दिन**




महिला दिनाच्या पूर्वसंध्येला जोशी बेडेकर महाविद्यालयातील 'मिळून साऱ्याजणी' या चमूने विकास गृहसंकुलात 'गाऊ त्यांना आरती' हा महाराष्ट्रातील विविध सामाजिक चळवळीतील स्त्रियांचे योगदान'या संकल्पनेवर कार्यक्रम सादर केला. हा कार्यक्रम सादर करण्यासाठी प्राचार्या नाईक मॅडम यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे प्रा. सुभाष शिंदे , डॉ. महेश पाटील, नीतिन पागी, डॉ. खराटे यांचे सहकार्य लाभले. संकुलात कार्यक्रमाला छान दाद मिळाली.

**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

**सत्र – I ची परीक्षा**

मुंबई विद्यापीठामार्फत घेतली जाणारी ऑक्टोबर– नोव्हेंबर सत्र – I ची परीक्षा ही राज्यातील सामान्य

प्रवेश प्रक्रियेतील प्रवेशास उशीर झाल्यामुळे दिनांक ७,१०,१२ आणि १४ फेब्रुवारी रोजी घेण्यात आली.

शोधनिबंध प्रकाशन – प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांचा "The Principle of Institutional Integrity : Bolstering Constitutionalism" हा शोध निबंध स्कॅलरली रिसर्च जनरल फॉर इंटरडिसिप्लिनरी स्टडिज या संशोधन मासिकात प्रकाशित झाला. सदर मासिकाचा प्रभाव घटक (Impact Factor) ६.३७ एवढा आहे. (Online ISSN 2278-8808 Print ISSN - 2319 - 4766)

**विद्यापीठ अनुदान आयोग उजळणी अभ्यासक्रम – संसाधन व्यक्ती**

मुंबई विद्यापीठाच्या मानव संसाधन विकास केंद्राने डॉ. श्रीविद्या जयकुमार यांना, 'भारतातील राजकीय स्थिती–मानवाधिकार दृष्टिकोन' या विषयावर सहाय्यक प्राध्यापकांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे उजळणी अभ्यासक्रमासाठी असणाऱ्या विषयावर व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित केले होते. सदर व्याख्यान हे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी कलिना परिसरात झाले.

**विधीबंध बैठक**

प्रभारी प्राचार्या यांनी ५ फेब्रुवारी, २०२० रोजी सायंकाळी ६.३० वाजता महाविद्यालयाच्या परिसरात विधीबंध यांच्या कार्यकारी समितीची बैठक बोलावली होती. दिनांक १३ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयाच्या परिसरात मोफत विधी सल्ला देण्याचे विधीबंध समितीच्या सदस्यांनी सहाय्य करण्यासाठी आनंदाने मान्य केले.

**मॅक्स महाराष्ट्र प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांसह मुलाखत**

महिलांवरील वाढती गुन्हेगारी ह्या संदर्भात प्राध्यापक व विद्यार्थ्यांची मुलाखत घेण्याकरिता मॅक्स महाराष्ट्र ह्या दूरदर्शन वाहिनीतील सदस्य दिनांक १० फेब्रुवारी रोजी महाविद्यालयात आले होते.

**प्राध्यापकांची बैठक**

दिनांक १० फेब्रुवारी रोजी प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी प्राध्यापक, ग्रंथपाल आणि कार्यालय अधीक्षक यांना कायदेशीर शिबिर आणि कार्यशाळेच्या वेळापत्रकासंबंधीच्या चर्चेसाठी, तसेच नेमून दिलेल्या कामगिरीसाठी बैठक बोलावली होती.

**सत्र प्रात्यक्षिक परीक्षा**

या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्ष विधीच्या ६०:४० पद्धतीमध्ये सी.जी.सी.एस.ने 'मसुदा' या प्रात्यक्षिक विषयावर परीक्षा घेण्याचे ठरविले आहे. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या नेतृत्वाखाली प्राध्यापक मिस रुपाली येरानेस, मिस हेतल मिशेरी आणि श्रीमती प्रीती गोपू नायर यांनी अभ्यास साहित्य तयार करून संकलित केले. प्रभारी प्राचार्या यांनी १४ फेब्रुवारीला अंतर्गत मूल्यांकन करण्यासाठी विद्यार्थ्यांना अभ्यास साहित्य वितरीत केले.

**महाविद्यालयीन स्पर्धा 'स्वातंत्र्य'**

हिंसाचार पीडित महिलेसाठी काम करणाऱ्या सेवाभावी संस्था मजलीस ह्यांच्या सहकार्याने महाविद्यालयाद्वारे 'शाब्दिक व अ–शाब्दिक शैली स्वातंत्र्य–लिंग समानता' ह्या विषयावर महाविद्यालयील स्तरावर दिनांक २९ फेब्रुवारी रोजी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

**शाब्दिक स्पर्धा**

१) वक्तृत्व स्पर्धा

२) काव्य पठण

३) गाणी

४) नाटक

न हरता, न थकता, न थांबता प्रयत्न करणाऱ्यांसमोर कधी कधी नशीब सुद्धा हरत!

**अ–शाब्दिक स्पर्धा**

१) रांगोळी

२) भित्तीपत्रिका बनवणे (पोस्टर मेकींग)



**शाब्दिक स्पर्धेचे विजेते**

१) मिस श्रुती मालगावकर आणि संघ (नाटक) विजेता

२) मिस अनुशा पठाण उपविजेता (काव्य पठण)

**अ–शाब्दिक स्पर्धेचे विजेते**

१) मिस मंगला कांबळे (रांगोळी)

२) मि. स्वप्निल इंगळे (भित्तीपत्रिका बनवणे)

**संशोधन केंद्र**

दिनांक १० फेब्रुवारी रोजी आमच्या महाविद्यालयामध्ये संशोधन केंद्राची सुरवात करण्यात आली. या आधीसुद्धा विद्यार्थ्यांना पेपर लिहिण्यासाठी उत्तेजित केले गेले होते. त्याप्रमाणे ५ पेपरसुद्धा प्रकाशित झाले आहेत.

**उद्देश :**

- विद्यार्थ्यांना संशोधन आणि लेखनात अभिमुखता देणे.
- संशोधन प्रकल्प घेणे.
- निष्कर्ष प्रकाशित करणे.

प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्या या केंद्राच्या मार्गदर्शक म्हणून काम पाहत आहेत.

**कायदा सहाय्यता शिबिर आणि कायदा जागृती कार्यशाळा**

प्रमुख पाहुणे : एस. बी. बहाळकर, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, ठाणे




**बहाळकर साहेबांनी मांडलेले मुद्दे**

१) कायद्याचे ज्ञान असल्याशिवाय सामान्य माणसाची प्रगती करणे शक्य नाही, कारण आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर कायदा आपल्याला मार्ग दाखवत असतो, जर तो मार्ग कळला नाही तर पुढे जाणे शक्य होत नाही.

२) विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून समाजातील घटकांना कसा न्याय मिळविता येईल याचेही मार्गदर्शन केले.

३) कायदा समजून घेणे, समजावून सांगणे हे सगळ्यांचे कर्तव्य असले पाहिजे. फक्त विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीच कायदा शिकला पाहिजे असा समज आता दूर केला पाहीजे.

४) अशा कार्यशाळा राबविणे व सामान्य माणसापर्यंत कायदा पोहोचविणे हा उपक्रम खूप चांगला आहे.

कारणं सांगणारी लोकं यशस्वी होत नाहीत.. आणि यशस्वी होणारे लोक कारणं सांगत नाहीत.

**एम. आर. देशपांडे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण**

'जिल्हा विधी सेवा प्राधिकरण' अनेक पद्धतीने समाजातील अनेक गरजू घटकांना कायदेशीर मदत करत असते. 'मनोधैर्य' सारखी योजना बलात्कार पीडित महिलेला आर्थिक व कायदेशीर मदत करते, त्याची माहिती सामान्य माणसाला माहीत असणे आवश्यक आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण गरीब व गरजू घटकांना मोफत व आवश्यक ती सर्व कायदेशीर मदत देत असते. यामध्ये वकील देणे, समुपदेशन करणे, मध्यस्थिच्या माध्यमातून तडजोड करणे, लोक अदालतीच्या माध्यमातून शक्यती तडजोड करणे.

या शिवाय डॉ. माधुरी पेजावर, प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार, प्रा. विनोद वाघ यांनीही मार्गदर्शन केले.

**पहिले सत्र :**

**विषय : कायदेशीर सहाय्य व मदत**

या सत्रामध्ये एम. आर. देशपांडे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कशाप्रकारे अनेक पद्धतीने समाजातील अनेक गरजू घटकांना कायदेशीर मदत करत असते. मनोधैर्य सारखी योजना बलात्कार पीडित महिलेला आर्थिक व कायदेशीर मदत करते, त्याची माहिती सामान्य माणसाला माहीत असणे आवश्यक आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण गरीब व गरजू घटकांना मोफत व आवश्यक ती सर्व कायदेशीर मदत देत असते. यामध्ये वकील देणे, समुपदेशन करणे, मध्यस्थीच्या माध्यमातून तडजोड करणे, लोक अदालतीच्या माध्यमातून शक्यती तडजोड करणे.

ॲड. नलगे यांनी ॲन्टी–रॅगींग कायदा व माहितीचा अधिकार या विषयावर मार्गदर्शन केले.

**दुसरे सत्र**

डॉ. पूजा नारवाडकर, सांगली यांनी कौटुंबिक हिंसाचार कायद्यावर मार्गदर्शन केले. ॲड. तृप्ती पाटील यांनी 'जादूटोणाविरोधी कायदा व महिलांचे शोषण' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच ॲड. अरुण गायकवाड यांनी सायबर सुरक्षा याविषयी माहिती दिली. सोशल मीडियाच्या माध्यमातून आपण सर्वच कसे चोराच्या हाती तिजोरीच्या चाव्या देत असतो याची त्यांनी अनेक उदाहरणे दिली.

**तिसरे सत्र**

मा. न्यायधीश किशोर चौधरी यांनी बाल गुन्हेगारी संबधी माहिती दिली. फक्त कायदा करुन बाल गुन्हेगारी संपणार नाही तर परिवार, शाळेमध्ये सकारात्मक वातावरण तयार करावे लागेल, मुलांच्या समस्या समजून त्यावर निराकरण करावे लागेल असे त्यांनी सांगितले.

माजी पोलिस उपायुक्त नागेश लोहार यांनी पोलिसांचे अटक करण्याचे अधिकार व अटक व्यक्तीचे अधिकार याविषयी माहिती दिली. ॲड. शाहीद अन्सारी, उच्च न्यायालय यांनी जामीनाचे विविध प्रकार व ते मिळविण्याच्या कायदेशीर पद्धती याविषयी माहिती दिली.

शेवटी आभार प्रदर्शन प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी केले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**फेब्रुवारी २०२० मधील कार्यक्रम / वार्ता**

१ फेब्रुवारी : डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनजमेंट स्टडीज, ठाणे म्हणजेच डॉ. व्ही.एन. ब्रीम्स (BRIMS) तर्फे शनिवार दिनांक १ फेब्रुवारी २०२० रोजी शाश्वत जागतिक आर्थिक योग्यतेसाठी शैक्षणिक भविष्यवेध : संशोधन, नवीनता आणि तंत्रज्ञान या विषय

सूत्रावर आधारीत आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. डॉ. व्ही. एन. ब्रीम्सचे संचालक डॉ. नीतिन जोशी यांनी स्वागतपर भाषण केले. या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी नामांकित व्यक्तींना आमंत्रित करण्यात आले होते. बी. ए. आर. सी. च्या (एनसीएससी) चे अध्यक्ष (१९६४-२००४) व अणू वैज्ञानिक डॉ. ए. पी. जयरामन, एस.ओ.एक्स आणि इंटरनल फायनान्स कंट्रोलचे सल्लागार श्री. दिलीप कुलकर्णी, श्री. मार्क नोवाकी आणि कॉर्पोरेट ट्रेनर श्री. अभय दौडखाणे या तज्ज्ञांनी शैक्षणिक भविष्यवेध या विषयावर आपली मते मांडली. संमेलनाच्या संयोजिका आणि डॉ. व्ही. एन. ब्रीम्सच्या प्रा. डॉ. स्मिता जपे यांच्या आभार प्रदर्शनाने परिषदेची सांगता झाली. आयोजन समिती सदस्या डॉ. मीनाक्षी व प्रा. कांचन या परिषदेच्या समन्वयक होत्या.




परिषदेच्या उत्तरार्धात म्हणजेच दुसऱ्या सत्रात, वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये ब्रीम्सच्या व इतर विविध महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.



डॉ. व्ही.एन. ब्रीम्सचे वार्षिक प्रकाशन असलेल्या सृजन (आय एस एस एन २४५६-४०७९) च्या फेब्रुवारी २०२० अंकाचे प्रकाशन करण्यात आले. प्रा. कृणाल के पुंजानी आणि विद्यार्थी संघाने आंतरराष्ट्रीय परिषदेत - सृजन २०२० चे अत्यंत कल्पकतेने विमोचन केले. डॉ. स्मिता जपे, डॉ. मिनाक्षी मल्होत्रा आणि डॉ. पल्लवी चांदवसकर यांचा समावेश असलेल्या संशोधन समिती मार्फत सृजनचे संकलन केले गेले आहे. परिषदेच्या दिवशी संशोधकांनी आपल्या शोध निबंधांचे सादरीकरण केले.




२ - ६ फेब्रुवारी : डॉ. व्ही.एन. ब्रीम्स तर्फे पीजीडीएमच्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. नीतिन जोशी, प्रा. दीप्ती पेरिवाल आणि प्रा. संदीप मोघे यांच्यासह सिंगापूर येथे शैक्षणिक सहल आणि औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले.



६ फेब्रुवारी : प्राध्यापक सदस्यांसाठी डॉ. अमित श्रीवास्तव यांचे प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले.

८ फेब्रुवारी : डॉ. नीतिन जोशी यांना एनआयपीएम येथे तज्ज्ञ समिती सदस्य म्हणून आमंत्रित करण्यात आले.

छत्री पावसाला थांबवू शकत नाही; पण पावसात थांबण्याचे धाडस नक्की देऊ शकते, तसेच आत्मविश्वास यशस्वी होण्याची खात्री देऊ शकत नाही, पण संघर्ष करण्याची प्रेरणा नक्की देऊ शकतो!



११ फेब्रुवारी : युसेन लॉजिस्टिक कंपनीच्या वरिष्ठ व्यवस्थापकांसाठीच्या मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्राम (एमडीपी) ला अंतिम रूप देण्याच्या बैठकीसाठी युसेन लॉजिस्टिक,च्या मानव संसाधन प्रमुख, श्रीमती अलेखा चिटणीस यांनी डॉ. व्ही.एन. ब्रीम्सला भेट दिली. डॉ. नीतिन जोशी, डॉ. गुरुप्रसाद मूर्ती आणि डॉ. अर्लोफ जॉन व्हिएरा यांच्याशी त्यांनी भेट घेतली.

१३ फेब्रुवारी : श्री संजय सपकाळ, डॉ. स्मिता जपे, प्रा. शेखर, डॉ. पल्लवी चांदवसकर आणि प्रा. कंचन अक्षय यांच्या ग्रंथालयाच्या समितीने चौथी ग्रंथालय बैठक आयोजित केली.



१३ फेब्रुवारी : डॉ. नीतिन जोशी यांना जेएसपीएमच्या कौटिल्य इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट पुणे येथे त्यांच्या संशोधन परिषदेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले.




१४ फेब्रुवारी : डॉ. व्ही.एन. ब्रीम्समध्ये फॅमिली मॅनेज्ड बिझिनेस सेलचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. आर्लोफ जॉन व्हिएरा आणि डॉ. पल्लवी चांदवसकर यांनी केले.



प्रा. कंचन अक्षय आणि डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी विद्यार्थी समितीच्या सहकार्याने 'ब्रीम्स कनेक्ट' या कार्यक्रमाचे आयोजन केले.




१५ फेब्रुवारी : डॉ. व्ही.एन. ब्रीम्स तर्फे प्राध्यापक सदस्यांसाठी डॉ. अमित श्रीवात्सव यांचे 'एनबीए प्रशिक्षण सत्र' आयोजित करण्यात आले

१६ फेब्रुवारी : हिरानंदानी मॅरॅथॉनमध्ये टीम ब्रीम्सने भाग घेतला. प्रा. कंचन अक्षय यांनी संघाच्या सहभागाचे संयोजन केले.

१८ फेब्रुवारी : डॉ. नीतिन जोशी यांनी प्रा. महेश भानुशाली यांच्यासमवेत एमडीपीच्या संधींसाठी व्हीवो मोबाईलच्या कॉर्पोरेट ऑफिसला/व्यवस्थापकीय कार्यालयाला भेट दिली.

१९ फेब्रुवारी : पी.जी.डी.एम. विद्यार्थ्यांनी प्रा. कांचन अक्षय यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने श्रद्धांजली म्हणून एका रोल प्ले / नाटिकेचे सादरीकरण केले.

तुम्ही गरीब म्हणून जन्माला आलात यात तुमचा काहीच दोष नाही, पण जर तुम्ही गरीब म्हणून मेलात तर हा नक्कीच तुमचा दोष असेल!

२३ फेब्रुवारी : पीतांबरी उद्योगाच्या क्रीडा दिन कार्यक्रमासाठी डॉ. नीतिन जोशी यांना मुख्य अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले.

२५ फेब्रुवारी : प्रा. महेश भानुशाली यांनी डॉ. व्ही.एन. ब्रीम्सचे एल.आर.क्यू.ए आयएसओ ९००१: २०१५ चे दुसरे बाह्य लेखापरीक्षण यशस्वीरित्या आयोजित केले. लेखा परीक्षक श्री. जोगळेकर यांनी डॉ. व्ही.एन. ब्रीम्सच्या आयटी विभागाचे, ऑनलाईन फीडबॅक यंत्रणा व ऑनलाईन हेल्पडेस्क संदर्भात विशेष कौतुक केले.



२७ फेब्रुवारी : डॉ. व्ही.एन. ब्रीम्सतर्फे एमएमएस आणि इपीएमबीएच्या विद्यार्थ्यांसाठी; डॉ. विजय बेडेकर, डॉ. नीतिन जोशी आणि डॉ. स्मिता जपे यांच्यासह दुबई येथे आंतरराष्ट्रीय औद्योगिक भेटीसाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. या सहलीत, यू-पॅक इंडस्ट्रीज, रसल केबल्स, फन रोबोटिक्स आणि डिजीवर्ल्ड या चार कंपन्यांची भेट घेण्यात आली.





२७ फेब्रुवारी : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, प्रा. विभूती सावे, श्रीमती दिपाली हिंदळेकर आणि विद्यार्थी






सांस्कृतिक समितीच्या सहकार्याने डॉ. व्ही . एन . ब्रीम्स तर्फे मराठी भाषा दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून जोशी बेडेकर महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. नारायण बारसे यांना आमंत्रित करण्यात आले.

डॉ. नीतिन जोशी यांना पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या पीटीव्हीए इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट तर्फे प्राध्यापकांच्या मुलाखतीसाठी विषय तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.